दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २५३ । शुक्रवार २६ जून २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




‘सहजयोग’

भाग ९३

## कुंडलिनी शक्ती

पुष्कळसे लोक माझ्याकडे येऊन म्हणतात, माताजी, आम्ही एवढं देवाचं ध्यान करतो पण आम्हाला कॅन्सर झाला. आम्ही एवढे देवळात जातो. सिद्धीविनायकाला रोज जाऊन उभे राहतो आम्ही, तासन् तास. मंगळवारी तर विशेष करून जातो. पण तरीसुध्दा आमचं काही भलं झालेलं नाही. हया देवाने आमचं काही भलं केलं नाही. अशा देवाला आम्ही कशाला भजायचं? कबूल आहे. अहो, तुम्ही ज्या देवाला बोलवता त्याचा तुमचा काही संबंध झालेला आहे का? काही कनेक्शन घडलेलं आहे का? तुमचं जोपर्यंत कनेक्शनचं नाही, तेव्हा तुमचं, भलं काय होणार? देवापर्यंत तुमचं टेलिफोनचं कनेक्शन तर जायला पाहिजे. इकडे बसून तुम्ही रात्रंदिवस पूजा करता परमेश्वराची. पण त्या परमेश्वराला ऐकायला आलंय का? तुम्ही काय बोलता ते. वाट्टेल ते धंदे करा. वाट्टेल तसे वागले आणि त्याच्यानंतर, हे परमेश्वरा, तू मला देतोस, की नाही, म्हणून ठिय्या मारून बसले. पण म्हणून त्या परमेश्वराने तुम्हाला कशाला द्यायचं? आता समजा इथे बसल्या-बसल्या कुणी जर इंग्लंडच्या राणीला म्हटलं, की ती आमच्यासाठी हे नाही करत, ते नाही करत. तिने कशाला करायचं? पण हा तर परमेश्वर आहे आणि हया परमेश्वरानी तुमच्यासाठी का करायचं? तुम्ही त्याच्या साम्राज्यात अजून आलेले नाहीत. फक्त त्याच्यावरती नुसती दडपशाही किंवा तानाशाही करायची, की अरे, परमेश्वरा जसं काही खिशातच बसलेला आहे. नंतर हा ही आपल्याला विचार असेल, की आता आम्ही परमेश्वराच स्मरण करायचं. सुस्मरण म्हटलेलं आहे, स्मरण काही म्हटलेलं नाही. सुस्मरण करतांना सुध्दा ‘सु’ आहे, की नाही ते पाहिलं पाहिजे ना. ‘सु’ म्हणजे काय? जसा ‘प्र’ शब्द आहे तसाच ‘सु’ शब्द आहे. ‘सु’ म्हणजे जिथे मनुष्याशी संबंध होऊन तुमच्यामध्ये मांगल्याचा आशीर्वाद झालेला आहे. तेव्हाच ते सुस्मरण होणार. नाहीतर बसलेत आपले पोपटपंची करत. त्याचा परिणाम तरुण पिढीवर होतो.त्याला इलाज हा, की ही जी शक्ती सगळीकडे वास करते त्या शक्तीचं आवलंबन केलं पाहिजे. २६ नोव्हेंबर १९८४ दादर

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# शेतकऱ्यांसह शेतमजुरांच्या आत्महत्या! महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबेना!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मंबई** : अल निनोच्या प्रभावाने गायब असणाऱ्या पावसामुळे राज्य चिंताग्रस्त असतानाचं एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र राज्यात २०२३ मध्ये एकूण ६,६६९ शेतकरी आणि शेतमजुरांनी आत्महत्या केली; यामध्ये २,५९९ शेतमजुरांचा समावेश आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी गुरुवारी विधिमंडळात दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांनी विचारलेल्या प्रश्नाला लेखी उत्तर देताना पाटील यांनी सांगितले की, ही आकडेवारी 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या ( एनसीआरबी ) २०२३ मधील अंदाजांवर आधारित



आहे.आत्महत्या केलेल्यांपैकी ४,१५० शेतकरी आणि २,५९९ शेतमजूर होते, हे खरे आहे. या शेतमजुरांपैकी ७७ महिला होत्या, असे मंत्री म्हणाले.कोणतीही शेतजमीन नसलेल्या २९ शेतमजुरांच्या आत्महत्यांची नोंद या यादीतून वगळण्यात आली आहे का, यावर विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना पाटील यांनी हे अंशतः खरे आहे, असे संक्षिप्त उत्तर दिले; मात्र त्यांनी त्याबाबत कोणताही तपशील किंवा स्पष्टीकरण दिले नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रकरणांचे वर्गीकरण आणि अधिकृत आकडेवारीमध्ये सर्व पात्र शेतमजुरांचा समावेश केला गेला आहे की नाही, याबद्दल चिंता व्यक्त केली जात असतानाच हे उत्तर आले आहे

# २३ आमदारांची ‘मविआ’ बैठकीला दांडी..!

## शिवसेना सहा खासदार फुटीनंतर आमदारांची चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** शिवसेना (यूबीटी) पक्षाचे सहा खासदार पक्षातून बाहेर पडल्याचा धक्का महाविकास आघाडीला देखील बसला आहे. खासदार फुटीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या बैठकीला विधानसभा आणि विधान परिषदेच्या एकूण ६० आमदारांपैकी ३७ आमदार उपस्थित राहिले, तर २३ आमदार अनुपस्थित राहिल्याने आघाडीला मोठा धक्का बसला आहे.

दरम्यान, या बैठकीला मार्गदर्शन करताना शिवसेना (यूबीटी) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी

**दांडी मारलेले प्रमुख आमदार**

**जयंत पाटील, राष्ट्रवादी (श.प.)**
**रोहित पवार,राष्ट्रवादी (श.प.)**
**उत्तमराव जानकर, राष्ट्रवादी (श.प.)**
**संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी (श.प.)**
**नाना पटोले, काँग्रेस**
**विजय वडेट्टीवार, काँग्रेस**
**अमित देशमुख, काँग्रेस**
**अनिल (बाळासाहेब) मांगुळकर, काँग्रेस अस्लम शेख, काँग्रेस**
**सुनील राऊत, शिवसेना (उबाठा)**
**गजानन लवटे, शिवसेना (उबाठा)**
**बाबाजी काळे, शिवसेना (उबाठा)**
**राहुल पाटील, शिवसेना (उबाठा)**
**संजय देरकर, शिवसेना (उबाठा)**

म्हणून आपण खरंच एकत्र आहोत का, असा प्रश्न उपस्थित करत येणाऱ्या काळात विधिमंडळ अधिवेशनापासून राज्यभरातील आंदोलनांमध्ये विरोधक म्हणून महाविकास आघाडीने एकी दाखवण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित आमदारांना केले.शिवसेना ठाकरे पक्षाला दुसऱ्यांदा पक्षफुटीला सामोरे जावे लागल्यानंतर महाविकास आघाडीने एकत्र यावे, यासाठी पक्षाने पुढाकार घेतला आहे. या पार्श्वभूमीवर 'मविआ'ची बैठक मुंबईतील वानखेडे स्टेडियम येथील सभागृहात पार पडली. मात्र या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार, जयंत पाटील वैयक्तिक कारणास्तव उपस्थित नव्हते. तसेच काँग्रेसचे आमदार नाना पटोलेही उपस्थित नव्हते. काँग्रेसचे विधीमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार प्रकृती ठीक नसल्याने आले नव्हते. या तिन्ही पक्षातील २३ आमदार या बैठकीला उपस्थित नसल्याने चर्चेला उधाण आले आहे.

## महत्त्वाचे..

### शहीद जवानांच्या वारसांना शासकीय जमिनी देताना मुद्रांक शुल्क माफी

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शहीद जवानांच्या वीर माता, वीर पत्नी किंवा अधिकृत वारसांच्या नावावर शासनाकडून देण्यात येणारी शेतीची जमीन हस्तांतरित करताना आकारले जाणारे मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान भवन परिसरात माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शहीद जवानांच्या कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळावा आणि जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ व्हावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी जमीन नावावर करताना मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. मात्र, आता महसूल खात्याची जमीन वीर माता, वीर पत्नी किंवा अधिकृत वारसांच्या नावावर करताना कोणतेही मुद्रांक शुल्क आकारले जाणार नाही. शासनाच्या या निर्णयामुळे शहीद जवानांच्या कुटुंबांवरील आर्थिक भार कमी होणार असून त्यांच्या सन्मानाला बळकटी मिळणार आहे.

# अवकाळी बाधित शेतकऱ्यांना ३३४.९८ कोटींची मदत मंजूर

- २.६७ लाख शेतकऱ्यांना दिलासा
- अहिल्यानगरसह नाशिक विभागासाठी १०३.३२ कोटींचा निधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** एप्रिल आणि मे २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ३३४ कोटी ९८ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीस मंजुरी दिली आहे. मदत व पुनर्वसन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, राज्यातील २ लाख ६७ हजार ६५६ शेतकरी आणि १ लाख ६३ हजार ७८८.७५ हेक्टर क्षेत्र या मदतीस पात्र ठरले आहे.

नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील १ लाख २९ हजार ८९६ शेतकरी व ५५ हजार ५५५.९० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १०३ कोटी ३२ लाख ७७ हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. कोकण विभागातील आंबा व काजू उत्पादकांना सर्वाधिक दिलासा मिळाला असून, तेथील १ लाख ३६ हजार ७५१ शेतकऱ्यांसाठी २०९ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

अमरावती विभागासाठी १९.८६ कोटी, नागपूर विभागासाठी १७.३४ कोटी, छत्रपती संभाजीनगर विभागासाठी २.०२ कोटी आणि पुणे विभागासाठी ४.३१ कोटी रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. पंचनामे, प्रस्ताव मंजुरी आणि निधी वितरणाची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या त्यांच्या निर्देशांमुळे अल्पावधीतच हा निधी मंजूर झाला. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांना मोठा आर्थिक आधार मिळणार असून शेतीच्या पुनर्बांधणीसही चालना मिळणार आहे.

# ट्रॅक्टर भाड्याने घेवून परस्पर विल्हेवाट लावणारा आरोपी जेरबंद

- अपहार केलेले दोन ट्रॅक्टर केले हस्तगत
- एमआयडीसी पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** फेसबुकवरील खरेदी-विक्री पेजवर भाड्याने ट्रॅक्टर पाहिजे अशी पोस्ट टाकून दरमहा भाडे देण्याचे आमिष दाखवत ट्रॅक्टर मालकांचा विश्वास संपादन करून त्या ट्रॅक्टरची परस्पर विल्हेवाट लावणाऱ्याला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून ९ लाख रूपये किमतीचे. दोन ट्रॅक्टर हस्तगत करण्यात आले आहेत. मल्हारी गहिनीनाथ जायभाये (वय ३२, रा. थाटे, ता. शेवगाव) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत बापुसाहेब नानासाहेब शिंदे (रा. खांबे, ता. संगमनेर, सध्या रा. चेतना कॉलनी, नवनागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मल्हार जायभाये याने विजेच्या तारा ओढण्यासाठी ट्रॅक्टर भाड्याने घेण्याची मागणी केली. दरमहा भाडे देण्याचे आश्वासन देत त्याने शिंदे यांचा ट्रॅक्टर ताब्यात घेतला. मात्र त्यानंतर भाडे न देता ट्रॅक्टरची (पान ४ वर)

# खा. संजय दिना पाटलांच्या वक्तव्यावर मुख्यमंत्री नाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** शिंदे शिवसेनेत नव्याने दाखल झालेले खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना खुले आम जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. शिंदे यांच्या शिवसेनेत शिस्त नाही. पक्षांतरानंतर संजय दिना पाटील यांच्या डोक्यात सत्ता आणि पैसा गेला आहे. आपल्याला कोणीही काहीच करू शकत नाही, असं संजय दिना पाटील यांना वाटत असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

**चौफेर टिकेनंतर संजय पाटलांची दिलगिरी**

संजय पाटील यांनी जाहीर दिलगिरी व्यक्त केली आहे. जो प्रकार माझ्यामध्ये आणि पत्रकारांमध्ये झाला आहे त्यासाठी मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. मला वाईट शब्दात शिवीगाळ करून अपमान करत होते. माझ्या परिवाराला आपण जे शिव्या देत आहेत, त्यापासून जरा लांब ठेवा असं मी सांगत होतो. घडलेल्या प्रकाराबद्दल मी माफी मागतो असे संजय दिना पाटील म्हणाले. अनवधानाने माझ्याकडून ते शब्द निघाल्याचे संजय दिना पाटील म्हणाले.

**तातडीने कोंडी सोडवावी**

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे मोठे आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे सरपंचांची कोंडी झाली असून स्थानिक विकासकामे ठप्प झाली आहेत. ग्रामपंचायतींचा आर्थिक कारभार पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने तातडीने कोंडी सोडवावी.

**– जयंत पाटील कुर्डुकर**
अध्यक्ष- अखिल भारतीय सरपंच परिषद

संजय दिना पाटील यांनी शिवराळ भाषेचा वापर केल्याने तसेच पत्रकारांना जीवे मारण्याची धमकी दिल्याने देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडल्यानंतर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीत संजय दिना पाटील यांनी केलेल्या विधानावर चर्चा करण्यात आली. सूत्रांच्या माहितीनुसार देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. (पान ४ वर)

# शनिशिंगणापूर देवस्थान विश्वस्त नियुक्ती प्रलंबित प्रकरण

## सर्वोच्च न्यायालयात १४ ऑगस्ट २०२६ रोजी पुढील सुनावणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** श्री शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर येथील विश्वस्त मंडळाच्या नियुक्ती आणि बरखास्तीच्या वादग्रस्त प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑगस्ट २०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. राज्य सरकार, देवस्थान प्रशासन आणि तत्कालीन विश्वस्त मंडळ यांच्यातील हा वाद अंतिम टप्प्यात पोहोचला असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाकडे राज्यभरातील शनि भक्त, ग्रामस्थ आणि संबंधित घटकांचे लक्ष लागले आहे.

श्री शनैश्वर देवस्थान हे देशातील प्रमुख धार्मिक स्थळांपैकी एक असून, देवस्थानच्या व्यवस्थापन आणि आर्थिक व्यवहारांबाबत गेल्या काही वर्षांपासून विविध स्तरांवर वाद सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने देवस्थानच्या कारभारात कथित अनियमितता आणि प्रशासनातील त्रुटींचा ठपका ठेवत २२ सप्टेंबर २०२५ रोजी तत्कालीन विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचबरोबर देवस्थानचा कारभार सुरळीत चालावा यासाठी अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात तत्कालीन विश्वस्त मंडळाने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सतीश तळेकर यांच्या माध्यमातून दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर औरंगाबाद खंडपीठाने १२ डिसेंबर २०२५ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत राज्य सरकारचा बरखास्तीचा आदेश रद्दबातल ठरवला. तसेच जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून करण्यात आलेली नियुक्तीही (पान ४ वर)

# मराठा आरक्षणासाठी स्वतंत्र कक्ष

## ■ न्यायालयीन लढ्याला मिळणार बळ

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे विखे पाटील यांच्याकडून आभार



मुंबई : मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध प्रलंबित प्रश्नांच्या प्रभावी पाठपुराव्यासाठी राज्य शासनाने सामान्य प्रशासन विभागात स्वतंत्र 'मराठा आरक्षण कक्ष' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाबद्दल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत, हा मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी उचललेला ऐतिहासिक टप्पा असल्याचे म्हटले आहे.

या स्वतंत्र कक्षामार्फत मराठा आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन प्रक्रियेचा समन्वय अधिक प्रभावीपणे केला जाणार असून, शासनाची कायदेशीर बाजू सक्षमपणे मांडण्यासाठी आवश्यक माहिती, कागदपत्रे आणि कार्यवाहीला गती दिली जाणार आहे. त्यामुळे आरक्षणासंदर्भातील प्रकरणांच्या सुनावणीला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

याशिवाय, एसईबीसी प्रवर्गातील नियुक्त्या, शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा आणि इतर शैक्षणिक योजनांशी संबंधित प्रश्नांचे एकाच ठिकाणी समन्वयन करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ अधिक जलद आणि सुलभ पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे.

'सारथी' संस्था तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्या अधिकाधिक युवकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारीही या कक्षाकडे सोपविण्यात आली आहे. तसेच हैदराबाद गॅझेटमधील कुणबी नोंदींच्या पडताळणीसाठी विशेष कार्यपद्धती (डजझ) राबविण्यात येणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करून प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करण्यात येणार आहे.मराठा समाजाच्या विकासासाठी, आरक्षणाच्या कायदेशीर लढ्याला बळकटी देण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# नसरापूरच्या दोषी नराधमाला २९ जूनला शिक्षा सुनावणार

## ३९ मिनिटे चिमुरडीला ओरबाडत राहिला, अंगावर १८ जखमेच्या खुणा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नसरापूर** : अत्याचार प्रकरणातील आरोपीला दोषी ठरवण्यात आले आहे. त्याला २९ जून रोजी शिक्षा सुनावली जाणार आहे. जेव्हा हे प्रकरण उघडकीस आले, तेव्हा संपूर्ण पुणे जिल्हा आणि महाराष्ट्रात प्रचंड खळबळ माजली होती. एका चार वर्षांच्या बालिकेसोबत झालेल्या या अमानुष कृत्यामुळे स्थानिक नागरिकांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले. आरोपीला कोणत्याही परिस्थितीत जामीन मिळू नये आणि त्याला थेट फाशीचीच शिक्षा व्हावी, अशी आक्रमक मागणी नागरिक, महिला संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी लावून धरली होती. अवघ्या १४ दिवसात हे प्रकरण न्यायालयासमोर नेत आरोपीला फाशीपर्यंत नेण्यात आले.

शिक्षा सुनावणीदरम्यान न्यायमूर्तींनी भीमराव कांबळे याला दोषी ठरवल्यानंतर त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. त्यानंतर भीमराव कांबळेला न्यायाधीशांनी विचारले की, 'तुला हा संपूर्ण प्रसंग आठवतो का? आता तूच सांग तुला कोणती शिक्षा द्यायची?', असा सवाल न्यायाधीशांनी विचारला. त्यावर भीमराव कांबळे याने पुन्हा आरोप फेटाळले. तो म्हणाला की, मी त्या दिवशी त्या मुलीला गाठी शेव खाण्यासाठी घेऊन गेलो होतो. त्यावेळी मी पाय घसरून पडलो आणि त्याचवेळी त्या मुलीच्या डोक्यालाही मार लागला. मी तिला शांत करण्याचा प्रयत्न केला पण ती सारखी ओरडत होती, असे भीमराव कांबळे याने म्हटले. यावर न्यायाधीश भीमराव कांबळेला म्हटले की आता तू जे सांगतो आहेस तो इतिहास झालाय, कारण तुझ्यावर गुन्हा सिद्ध झालाय. तुला कोणती शिक्षा द्यायला हवी . न्यायाधीशांच्या या म्हणण्यावर भीमराव कांबळेने कोणतेच उत्तर दिले नाही. त्यानंतर न्यायाधीशांनी त्याला खाली बसायला सांगितले.

न्यायाधीश म्हणाले की, ही घटना समाजासाठी घातक आहे. त्या दुर्दैवी मुलीवर झालेले अत्याचार न्यायालयात सिद्ध झालेत. परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदार यांच्या आधारे हा गुन्हा सिद्ध झाला आहे. आरोपीच्या आधीच्या गुन्ह्यांचा इतिहास पाहता तो कोणत्याही परिस्थितीत सुधरू शकत नाही. या आधीच्या दोन गुन्ह्यांमधे हा आरोपी दुर्दैवीरित्या सुटला होता. मात्र तो समाजासाठी घातक आहे. तो सुधारण्याच्या पलिकडे गेला आहे. त्यामुळे फक्त फाशी हीच या आरोपीला योग्य राहील, असे सरकारी वकील म्हणाले. आरोपीच्या वकिलांनी या गुन्ह्यातील घटनांची संगती लगत नसल्याचा युक्तीवाद केला. त्याचबरोबर आरोपीच्या वकिलांनी तो स्वत या (पान ४ वर)

# उपवर्गीकरण की मूलभूत न्याय?




अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रश्न पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय केंद्रस्थानी आला आहे. राज्य सरकारने न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या शिफारशींवर अभिप्राय मागविल्यानंतर विविध संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. 'बीड ते मंत्रालय' लाँग मार्च, धरणे आंदोलने आणि निषेध मोर्चांमधून या विषयावरील अस्वस्थता स्पष्ट दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर हा प्रश्न केवळ आरक्षणाच्या वाटपापुरता मर्यादित नसून सामाजिक न्यायाच्या व्यापक संकल्पनेशी जोडलेला असल्याचे लक्षात घेणे आवश्यक आहे.

उपवर्गीकरणाच्या समर्थनामागील प्रमुख युक्तिवाद असा आहे की, अनुसूचित जातींमधील काही समाजघटकांना आरक्षणाचा तुलनेने अधिक लाभ झाला, तर काही घटक आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. त्यामुळे सर्वाधिक वंचित घटकांपर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचवण्यासाठी अंतर्गत वर्गीकरण आवश्यक असल्याचे मत मांडले जाते. सर्वोच्च न्यायालयानेही विशिष्ट परिस्थितीत अशा उपवर्गीकरणाचा मार्ग खुला केला आहे. मात्र त्यासाठी ठोस सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय आकडेवारीचा आधार आवश्यक असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

दुसरीकडे या निर्णयाला विरोध करणाऱ्यांचा मुद्दा वेगळा आहे. त्यांच्या मते, अनुसूचित जातींच्या मागासलेपणाचे मूळ कारण आरक्षणाच्या अंतर्गत वाटपात नसून शिक्षण, आरोग्य, रोजगार, अर्थसंकल्पीय तरतुदी आणि विकास योजनांच्या अपुऱ्या अंमलबजावणीत आहे. त्यामुळे उपवर्गीकरण हा मूळ समस्येवरचा उपाय नसून तो केवळ परिणामांवर दिलेला प्रतिसाद आहे. सरकारने प्रथम मूलभूत सामाजिक व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी अधिक प्रभावी धोरणे राबविणे गरजेचे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

या वादात अर्थसंकल्पीय वाटचाचाही मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात आहे. अनुसूचित जाती-जमातींसाठी असलेल्या निधीची रक्कम, लक्ष्यित योजनांवरील खर्च, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील अपुरी गुंतवणूक याकडे लक्ष वेधले जात आहे. अनेक सामाजिक अभ्यासांत अनुसूचित जातींमध्ये शैक्षणिक गळती, आरोग्यविषयक असमानता आणि आर्थिक मागासलेपणा अद्याप कायम असल्याचे नमूद केले जाते. त्यामुळे केवळ आरक्षणाची चौकट पुरेशी ठरत नाही; तर त्या चौकटीला पूरक अशा विकासात्मक उपाययोजनांचीही आवश्यकता आहे.

रोजगाराचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. गेल्या काही दशकांत सार्वजनिक क्षेत्रातील रोजगाराच्या संधी कमी झाल्या असून खासगी क्षेत्राचा विस्तार झाला आहे. खासगी क्षेत्रात आरक्षण नसल्याने सामाजिक प्रतिनिधित्वाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनल्याची टीका अनेक सामाजिक संघटना करतात. त्याचवेळी सरकारचा युक्तिवाद असा असतो की, कौशल्यविकास, उद्योजकता, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या योजनांद्वारे सामाजिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. या दोन्ही भूमिकांचा वस्तुनिष्ठ अभ्यास होणे आवश्यक आहे.

बदर समितीच्या अहवालाबाबतही पारदर्शकतेचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. अहवाल सार्वजनिक न करता त्यावर अभिप्राय मागविण्यात आल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशा संवेदनशील विषयांमध्ये सामाजिक विश्वास टिकवायचा असेल तर समितीचा आधार, वापरलेली आकडेवारी, निकष आणि निष्कर्ष पारदर्शकपणे समाजासमोर ठेवणे आवश्यक आहे. अन्यथा संशय, अफवा आणि सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनुसूचित जातींच्या प्रश्नाकडे केवळ कायदेशीर किंवा राजकीय दृष्टीने पाहणेही पुरेसे ठरणार नाही. सामाजिक न्याय हा भारतीय संविधानाचा मूलभूत आधार आहे. समान संधी, सन्मानाने जगण्याचा अधिकार आणि विकासातील सहभाग या तिन्ही गोष्टी एकत्रितपणे साध्य झाल्या तरच संविधानाचा उद्देश पूर्ण होईल. त्यामुळे आरक्षणासोबतच गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुलभ आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि आर्थिक सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक अपरिहार्य आहे.

आज गरज आहे ती संघर्षाची नव्हे, तर विश्वास निर्माण करणाऱ्या संवादाची. सरकारने उपलब्ध सर्व आकडेवारी, समितीचा अहवाल आणि धोरणात्मक कारणमीमांसा सार्वजनिक करावी. विविध समाजघटक, तज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांशी व्यापक चर्चा करूनच अंतिम निर्णय घ्यावा. न्यायालयीन प्रक्रियेलाही वस्तुनिष्ठ सामाजिक आकडेवारीचा मजबूत आधार मिळणे तितकेच आवश्यक आहे.

उपवर्गीकरण योग्य की अयोग्य, याचा अंतिम निर्णय न्यायालयीन आणि घटनात्मक प्रक्रियेतून होईल. मात्र कोणताही निर्णय समाजातील ऐक्य, सामाजिक न्याय आणि समान संधी या संविधानिक मूल्यांना धक्का पोहोचवणारा नसावा. आरक्षणावरील चर्चा केवळ जागांच्या वाटपापुरती मर्यादित न राहता विकासाच्या समान संधी निर्माण करण्यावर केंद्रित झाली, तरच या वादातून समाजाला दीर्घकालीन आणि सकारात्मक दिशा मिळू शकेल.

अवाजवी घरपट्टी रद्द करण्याचा ठराव मंजूर न केल्याने

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांचा सभात्याग

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा गुरुवार दि. २५ रोजी कोपरगाव नगरपरिषद सभागृहात पार पडली. यावेळी कोपरगाव नगरपरिषदेने केलेली अवाजवी घरपट्टी (मालमत्ता कर) रद्द करण्याचा ठराव मंजूर न केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी निषेध व्यक्त करत सभात्याग केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी दिली आहे. कोपरगाव नगरपरिषदेने केलेली अवाजवी घरपट्टी (मालमत्ता कर) वाढ हि अत्यंत चुकीची आणून नागरिकांचे कंबरडे मोडणारी आहे. सध्या दुष्काळजन्य




परिस्थिती असताना देखील कोपरगाव नगरपरिषदे कडून वाढीव करपट्टी लादण्यात येत आहे. वाढीव करामध्ये मालमत्तांचे वर्गीकरण, निर्धारीकरण कसे केले याची कोणतीही अधिकृत माहिती नागरिकांना देण्यात आली नाही तरी देखील नागरिकांना वाढीव दराच्या घर पट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये नागरिकांवर थोडी थोडकी नव्हे तर दुप्पट, तिप्पट, चौपट करवाढ लादण्यात आली आहे. यामुळे हि घरपट्टी (मालमत्ता कर) वाढ रद्द करावी आणि ज्या एजन्सीने अत्यंत चुकीच्या पद्धतीने करवाढ संदर्भात सर्व्हेक्षण केले आहे ते रद्द करून नव्याने पुन्हा सर्व्हेक्षण करण्यात यावे. हे ठराव सत्ताधाऱ्यांनी मान्य न केल्याने सत्ताधाऱ्यांच्या समाज विरोधी धोरणाच्या आणि हुकूमशाही वृत्तीच्या विरोधात घोषणाबाजी करीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी सभात्याग केला. सभा सुरु होण्यापूर्वी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी सत्ताधारी नगरसेवक आणि नगराध्यक्ष यांना गुलाबपुष्प देऊन वाढीव घरपट्टी रद्द करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. नगरपरिषदेने लागू केलेली घरपट्टी अत्यंत अवाजवी आणि सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारी नसल्याने हजारो नागरिकांनी वाढीव घरपट्टी विरोधात नगरपरिषदेत आणि आ. आशुतोष काळे यांच्या संपर्क कार्यालयात शेकडो हरकती नोंदविल्या असल्याने या अवाजवी घरपट्टी विरोधात आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ व २३ जून रोजी कोपरगाव शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे धरणे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल यांनी तात्पुरती स्थगिती देण्याचे लेखी आश्वासन दिले असल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले होते. मात्र सर्वसाधारण सभेत कोणत्याही प्रकारची सकारात्मक चर्चा झाली नाही. हि अवाजवी घरपट्टी (मालमत्ता कर) अत्यंत चुकीची असल्याचे पुरावे अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सादर करून वाढीव घरपट्टी रद्द करण्याची मागणी करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# नशाबंदी जिल्हा संघटकपदी तुकाराम महाराज कदम यांची नियुक्ती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीयमपूर:** नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये संघटक म्हणून नियुक्ती करण्यासाठी वर्धा येथे झालेल्या शिबिरामध्ये अहिल्यानगरचे जिल्हा संघटक म्हणून अशोक नगर फाटा स्थित भानुदास महाराज बोरुडे विठ्ठल रुक्मिणी मंदिर आश्रमाचे उत्तराधिकारी तुकाराम महाराज कदम यांची नियुक्ती करण्यात आती आहे. महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाची वार्षिक सभा वर्धा येथे नुकतीच पार पडली असून नशाबंदी मंडळाचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू राजन वेळूकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे नशाबंदी मंडळाच्या संघटकांना देण्यात आली. याप्रसंगी सरचिटणीस वर्षा विद्या विलास तसेच मुख्य संघटक व चिटणीस अमोल मोडामे, चंद्रकांत चौधरी, बास्को डिसुझा, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्षाच्या नीतिका तसेच अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षांपासून तुकाराम महाराज बोरुडे हे नशाबंदी मंडळाचे कार्य चांगल्या प्रकारे करीत आहेत वारकऱ्यांची दिंडी असो विद्यार्थ्यांचे शाळा असो ग्रामीण भागात ज्या ज्या ठिकाणी समुदाय दिसेल त्या त्या ठिकाणी नशाबंदीबाबतचा प्रचार करण्यास ते कधीच विसरत नाहीत. नशाबंदी हे एक सामाजिक व राष्ट्रीय कार्य असल्याने ते त्याचा सातत्याने प्रचार करत असतात त्यांच्या निवडीबद्दल अनेक लोकांनी स अभिनंदन केले आहे .



# साई प्रसादालयातील वातड चपाती व्हायरल केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या प्रसादालयात जेवण करण्यासाठी गेल्यानंतर तेथील कर्मचाऱ्यांकडून वातड झालेली चपाती वाढली असता त्याचा व्हीडिओ चित्रीकरण करणे कर्मचाऱ्यांशी अरेरावी, शिवीगाळ, कामकाजात अडथळा निर्माण करणे, साईभक्तांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणे सोशल मीडियावर संस्थानची बदनामी केल्या प्रकरणी कोपरगाव येथील भरत मोरे याच्याविरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

साई संस्थानच्या प्रसादालय विभागातील पर्यवेक्षक जगन्नाथ सिताराम मुंढे (वय ५५) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

दि. २३ जून रोजी दुपारी सुमारे २.४० वाजण्याच्या सुमारास सशुल्क भोजन हॉलमध्ये नेहमीप्रमाणे साईभक्तांना भोजन देण्याचे काम सुरू होते. यावेळी प्रसादालयातील अनेक कर्मचारी ड्युटीवर कार्यरत होते. त्याचवेळी जेवणासाठी आलेले भरत मोरे यांच्या ताटात वातड झालेली चपाती वाढली असता चपाती उशिरा मिळाल्याच्या कारणावरून त्यांनी आक्षेप घेत कर्मचाऱ्यांशी वाद घालत त्यांनी मोठमोठ्याने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांनी आपल्या सोबत असलेल्या व्यक्तीस मोबाईलवर संपूर्ण घटनेचे चित्रीकरण के ले . प्रसादालयातील कर्मचाऱ्यांविषयी अपमानास्पद व आक्षेपार्ह भाषा वापरत शिवीगाळ केली. तसेच काही कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून जाऊन त्यांचे ओळखपत्र हाताने ओढून तपासले. एका कर्मचाऱ्याला त्याच्या भाषिक ओळखीवरूनही लक्ष्य करण्यात आले या प्रकारामुळे प्रसादालयातील कर्मचाऱ्यांच्या नियमित कामकाजात अडथळा निर्माण करून भोजनासाठी आलेल्या साईभक्तांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले तसेच मी तुम्हाला येथे कोणालाही काम करू देणार नाही अशी धमकी देत प्रसाद वाटपाचे काम थांबविण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर सदर घटनेचा व्हिडिओ इन्स्टाग्राम व फेसबुक वर दाखवून प्रसादालयातील चपाती आणि पापड खाण्यास अयोग्य आहेत असे दाखवून संस्थानची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्याच्या कारणावरून भरत मोरे विरोधात धमकावणे, कामकाजात अडथळा, बदनामी अशा विविध कलमाखाली गुन्हा नोंदविण्यात आला आहे .

# आद्रा नक्षत्रात पावसाची हजेरी

मात्र जोर नसल्याने तालुक्यातील शेतकरी चिंतेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** ; श्रीगोंदा तालुक्यात २३ जून रोजी आद्रा नक्षत्राच्या प्रारंभी काही भागांत पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी बरसल्या. मात्र पावसाला अपेक्षित जोर नसल्याने शेतकऱ्यांची चिंता कायम आहे. रोहिणी आणि मृग नक्षत्र कोरडे गेल्यानंतर आद्रा नक्षत्राकडून मोठ्या अपेक्षा होत्या. परंतु सध्या ''जिथे ढग तिथेच पाऊस'' अशी परिस्थिती निर्माण झाल्याने खरीप हंगामाबाबत अनिश्चितता वाढली आहे.

यंदाचा पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने तालुक्यातील पाणीप्रश्न गंभीर बनला आहे. हवामान तज्ज्ञांनी आद्रा नक्षत्रात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवली असली, तरी त्याबाबत शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

गेल्या वर्षी मे महिन्याच्या अखेरीस झालेल्या जोरदार पावसामुळे ओढे, नाले व विहिरी भरल्या होत्या. त्यामुळे खरीप हंगामाला मोठा आधार मिळाला होता. मात्र यंदा पावसाने ओढ दिल्याने खरीप पेरण्या लांबणीवर पडल्या आहेत. त्यातच उन्हाची तीव्रता वाढल्याने उपलब्ध पाण्याचेही मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन झाले आहे.

तालुक्यात पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक शेतकऱ्यांनी फळबागा वाचवण्यासाठी टँकरद्वारे पाणी विकत घेऊन झाडे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला. कुकडी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना उन्हाळी आवर्तनाच्या पाण्याची अपेक्षा होती. मात्र ते न मिळाल्याने त्यांची अडचण वाढली आहे.

धरणांतील पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. ग्रामीण भागातील अनेक गाव तलाव कोरडे पडल्याने जनावरांच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

दरम्यान, पावसाअभावी खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत असून प्रशासनाने टंचाई आढावा बैठका न घेतल्याबद्दलही शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. निवडणुकांच्या काळात आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आता शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना ग्रामीण भागात व्यक्त होत आहे.

**शेतकऱ्यांच्या अपेक्षा कर्जमाफीकडे**

राज्य सरकारने कर्जमाफीबाबत ३० जूनपर्यंतची मुदत दिली आहे. सध्या पात्र शेतकऱ्यांची फेरतपासणी सुरू असल्याची माहिती मिळत आहे. अनेक शेतकरी थकीत कर्जामुळे नव्याने पीककर्ज घेऊ शकत नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे. त्यामुळे सरसकट कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी जोर धरत आहे.

# सोनेवाडी–गोरक्षनाथ रस्त्याची दुरवस्था;

वाढलेली काटेरी झाडे हटविण्याची मागणी

**कोपरगाव** : शिर्डी–नाशिक मार्गाला जोडणाऱ्या सोनेवाडी–गोरक्षनाथ रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेल्या काटेरी झाडांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. प्रशासनाने तातडीने झाडांची छाटणी करून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी मागणी शिवसेनेचे पदाधिकारी रमेश ढवळे यांनी केली आहे.

या रस्त्याचे दोन वर्षांपूर्वी खडीकरण करण्यात आले होते. मात्र नियमित देखभालीअभावी रस्ता नादुरुस्त झाला आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे रस्त्यावरील खड्डे आणि अडथळे अधिक वाढले असून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रुग्णांना दवाखान्यात नेताना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.या मार्गावर महाराष्ट्र शासन अनुदानित आदिवासी आश्रमशाळा असून विद्यार्थी व शिक्षकांनाही दैनंदिन प्रवासात त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील अनेक कुटुंबे या रस्त्यावर अवलंबून आहेत. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व नागरिक दररोज या मार्गाने प्रवास करतात.



मरस्त्याच्या दुरवस्थेमुळे आपत्कालीन सेवांनाही अडथळे निर्माण होत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रशासनाने तातडीने वाढलेली काटेरी झाडे हटवून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी रमेश ढवळे यांनी केली आहे.

# कणगर ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये केलेला भ्रष्टाचार दाखवा : सर्जेराव घाडगे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कणगर बु.येथील ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप काही विरोधकांकडून करण्यात येत असला, तरी त्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे ग्रामपंचायतीच्या नोंदी व प्रत्यक्ष विकासकामे दाखवून स्पष्ट करण्यात आले असून विरोधकांचा दावा सरपंच सर्जेराव घाडगे यांनी खोडून काढला आहे. गावाच्या विकासकामांबाबत चुकीची माहिती पसरवून बदनामी करणाऱ्या विरोधकांविरोधात संभाजीनगर उच्च न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करून आपण न्याय मागणार असल्याचा इशारा सरपंच सर्जेराव घाडगे यांनी विरोधकांना दिला आहे.

कणगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत सरपंच घाडगे यांनी ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा



सविस्तर लेखाजोखा पत्रकारांसमोर मांडला. यावेळी त्यांनी गावातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि इतर विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून दिली. विरोधकांकडून ज्या रस्त्याचे काम झालेलेच नाही त्या रस्त्याचे खोटे फोटो प्रसिद्धीसाठी दिले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्या विकासकामांच्या प्रक्रियेत स्पष्ट फरक आहे. जिल्हा परिषदेच्या कामांच्या निविदा जिल्हा परिषद प्रशासनामार्फत राबविल्या जातात, तर स्थानिक स्वरूपाची कामे ग्रामपंचायतीमार्फत केली जातात. यामुळे सर्व कामे नियमानुसार आणि संबंधित विभागांच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात आली आहेत.

कणगर–गुहा व गणेगाव वडनेर घाडगे वस्ती रस्त्याच्या कामाचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, या रस्त्यासाठी प्रथम ७०० मीटर, त्यानंतर ६०० मीटर ७०० मिटर ६०० मिटर आणि ७०० मीटर असा मंजूर झालेला निधी टप्प्याटप्प्याने मिळालेला आहे. या कामासाठीचा निधी एकरकमी न मिळता जिल्हा परिषदेकडून तब्बल १३ हप्त्यांमध्ये उपलब्ध करून देण्यात आला. जेवढी कामे झाली तेवढ्यांची मोजमापे करून त्यांचे अधिकृत नोंदवहीच्या आधारेच देयके अदा करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कणगर ग्रामपंचायतीचे विकासकामे प्रत्यक्ष दिसत असतानाही काही विरोधक राजकीय हेतूने दिशाभूल करून निराधार आरोप करीत असल्याचे घाडगे यांनी विरोधकांना फटकारले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे आरोप होत असल्याचे सांगितले. काही व्यक्ती विकास कामात अडथळा आणून राजकारण करण्याचा प्रयत्न करीत असून गावातील चार–पाच जणांना पुढे करून ग्रामपंचायतीची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा दावा त्यांनी केला.

# महाराष्ट्रात समान नागरी कायद्याची चाहूल

समानतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल की नव्या वादाची नांदी?

महाराष्ट्रात समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने अधिकृत हालचाली सुरू केल्या आहेत. विधानसभेत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती स्थापन केली जाणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे देशात गोवा, उत्तराखंड, गुजरात आणि आसामनंतर महाराष्ट्रही समान नागरी कायदा लागू करणाऱ्या राज्यांच्या यादीत सामील होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

समान नागरी कायदा म्हणजे विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तक, पोटगी आणि कौटुंबिक मालमत्तेच्या वाटपासंदर्भात सर्व धर्मांच्या नागरिकांसाठी एकच समान कायदा लागू करणे. सध्या भारतात फौजदारी कायदे सर्वांसाठी समान असले तरी वैयक्तिक कौटुंबिक बाबींमध्ये विविध धर्मांचे स्वतंत्र वैयक्तिक कायदे लागू आहेत. याच विसंगतीवर उपाय म्हणून भारतीय राज्यघटनेतील कलम ४४ मध्ये राज्याने समान नागरी कायद्याच्या दिशेने प्रयत्न करावेत, असे मार्गदर्शक तत्त्व नमूद करण्यात आले आहे.

या कायद्यामागील प्रमुख उद्दिष्ट म्हणजे महिलांना समान हक्क मिळवून देणे, कौटुंबिक न्यायव्यवस्था सुलभ करणे आणि नागरिकांमध्ये कायद्यापुढील समानता निर्माण करणे. कायदा लागू झाल्यास बहुपत्नीत्वाला पूर्णविराम मिळू शकतो, मुलगा आणि मुलगी यांना समान वारसाहक्क मिळेल, घटस्फोटाची प्रक्रिया एकसमान होईल आणि पोटगीचे निकषही सर्वांसाठी समान राहतील.

गोवा हे देशातील समान नागरी कायद्याचे सर्वात जुने उदाहरण आहे. पोर्तुगीज नागरी संहितेच्या आधारे तेथे पती–पत्नीला विवाहानंतर मालमत्तेवर समान हक्क दिले जातात. उत्तराखंडमध्ये २७ जानेवारी २०२५ पासून समान नागरी कायदा लागू करण्यात आला. त्यानंतर विवाह नोंदणी पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून प्रशासन अधिक पारदर्शक झाल्याचा दावा करण्यात येतो. गुजरात आणि आसामनेही २०२६ मध्ये या दिशेने कायदे मंजूर केले आहेत, तर मध्य प्रदेशातही प्रक्रिया सुरू आहे.

मात्र, या कायद्यासंदर्भात काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होत आहेत. उत्तराखंड, गुजरात आणि आसाम या राज्यांनी अनुसूचित जमातींना (एसटी) या कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवले आहे. महाराष्ट्रात पेसा कायदा आणि पाचव्या अनुसूचीतील मोठे आदिवासी क्षेत्र असल्याने राज्य सरकार कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संपूर्ण राज्यातील आदिवासींना सूट दिली जाणार की केवळ अनुसूचित क्षेत्रापुरती, हा महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे.याशिवाय उत्तराखंडमध्ये लिव्ह–इन रिलेशनशिप नोंदणीची सक्ती केल्यामुळे गोपनीयतेच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. महाराष्ट्र सरकार अशा वादग्रस्त तरतुदींमध्ये बदल करणार का, याबाबतही उत्सुकता आहे.समान नागरी कायद्याबाबत अनेक गैरसमजही समाजात पसरलेले आहेत. हा कायदा लागू झाल्यास आरक्षण संपेल किंवा धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येईल, अशी भीती व्यक्त केली जाते. प्रत्यक्षात समान नागरी कायद्याचा संबंध केवळ विवाह, घटस्फोट, दत्तक आणि वारसाहक्क यांसारख्या कौटुंबिक बाबींशी आहे. शिक्षण किंवा सरकारी नोकऱ्यांतील आरक्षणाशी त्याचा कोणताही संबंध नसल्याचे केंद्र सरकार आणि विधी आयोगाने वेळोवेळी स्पष्ट केले आहे.या विषयावर राजकीय आणि सामाजिक मतभेद कायम आहेत. समर्थकांच्या मते, समान नागरी कायदा हा महिलांच्या सक्षमीकरणाचा आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा विजय आहे. विरोधकांच्या मते, विविध धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य जपत व्यापक सामाजिक संवादानंतरच असा कायदा लागू झाला पाहिजे.

महाराष्ट्रात आता मसुदा समितीचा अहवाल, त्यावरील सार्वजनिक चर्चा आणि त्यानंतर विधानसभेतील निर्णय या टप्प्यांतून समान नागरी कायद्याचा प्रवास होणार आहे. त्यामुळे हा विषय केवळ कायदेशीर नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. समानता आणि विविधता यांच्यात समतोल साधत महाराष्ट्र कोणता मार्ग स्वीकारतो, यावर संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# पुणतांबा जंक्शनला दर्जा मात्र स्वतंत्र बसस्थानकाकडे दुर्लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : दौंड–मनमाड रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे रेल्वे स्थानक म्हणून ओळख असलेल्या पुणतांबा रेल्वे स्टेशनला पुणतांबा–शिर्डी रेल्वे मार्गामुळे रेल्वे जंक्शनचा दर्जा मिळाला आहे. मात्र, २० हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या पुणतांबा गावासाठी अद्याप स्वतंत्र व अद्ययावत बसस्थानक उभारण्यात आलेले नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राहाता, कोपरगाव, वैजापूर आणि श्रीरामपूर या चार तालुक्यांच्या सीमेवर असलेले पुणतांबा हे गाव आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या श्रीक्षेत्र शिर्डीपासून अवघ्या १४ किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे येथे प्रवाशांची मोठी वर्दळ असते. अनेक वर्षांपासून स्वतंत्र बसस्थानकाची मागणी होत असली तरी ती अद्याप पूर्ण झालेली नाही.

सध्या स्टेशन रोडवरील बसथांब्यावरून बससेवा दिली जाते. मात्र, येथील शेड जीर्ण अवस्थेत असून प्रवाशांना बसण्याचीही सोय नाही. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळ्यात प्रवाशांना रस्त्यावर उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे नागरिक आणि प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

पुणतांबा रेल्वे जंक्शन असले तरी येथे मोजक्याच रेल्वेगाड्यांना थांबा आहे. त्यामुळे बहुतांश नागरिकांचे दळणवळण हे बससेवेवरच अवलंबून आहे. तसेच श्रीक्षेत्र पुणतांब्याच्या विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्याचे नियोजन सुरू असल्याने भविष्यात प्रवाशांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. बसस्थानकासाठी कोपरगाव रोडलगत पर्यायी जागा उपलब्ध असून महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालकीची जमीनही उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे स्वतंत्र बसस्थानक उभारण्यासाठी कोणतीही अडचण नसल्याचे ग्रामस्थांचे मत आहे.

राहाता तालुक्यातील व कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांब्याचा हा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न नेमका कधी मार्गी लागणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## बऱ्हाणपूर येथे शेतकऱ्यांशी कृषी कन्यांनी शेती विषयी केले हितगुज



**चांदा** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीच्या सोनई येथील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण जागरूकता व कृषि कार्यानुभव अंतर्गत नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपर येथील गावाला भेट दिली व उशिरा येणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मार्गदर्शन व चर्चा सत्र शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजनांवर चर्चा केली. पाऊस उशिरा पडल्यावर शेती कश्या पद्धतीने केली पाहिजे, यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत या विषयी शेतकऱ्यांशी सल्ला मसलसत केली. या वेळी कृषिकन्या पोर्णिमा काळभोर , साक्षी भांबुरे , प्रतीक्षा गोडसे, आर्द्रा नायर, हिमांशी गवळी यांनी या मध्ये सहभाग नोंदवला तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. दिशा चव्हाण, प्रा.नरेंद्र दहातोंडे, डॉ. संतोष चौगुले, यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी चर्चासत्रामध्ये बऱ्हाणपूर येथील शेतकरी सहभागी झाले होते.

## भाजपा युवा मोर्चाच्या नगर उत्तर जिल्हा उपाध्यक्ष पदी : पवार



**पानेगांव** : भारतीय जनता युवा मोर्चा अहिल्या नगर उत्तर जिल्हा उपाध्यक्ष पदी महेश पवार यांची निवड करण्यात आली. नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथून समाजसेवेची सुरवात करणारे महेश पवार हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे स्वयंसेवक असून यापूर्वी त्यांच्यावर भाजपा युवा मोर्चा नेवासा तालुका चिटणीस, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सचिव, भाजपा युवा मोर्चा जिल्हा कोषाध्यक्ष पदाची जबाबदारी होती. या पदावर असताना त्यांनी परिसरातील अनेक गावामध्ये वृक्षारोपण,आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, शालेय साहित्य वाटप अनेक उपक्रम राबवले आहे. या कामाची दखल घेत पक्षांश्रेष्टींनी त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपावली आहे. या निवडीबद्दल भाजपचे उपप्रदेशाध्यक्ष मा.खा. सुजय विखे भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, भाजपा उपजिल्हाध्यक्ष सचिन देसरडा, ऋषिकेश शेटे,भाजप नेवासा तालुकाध्यक्ष मनोज पारखे, प्रताप चिंधे, डॉ. बाळासाहेब कोलते आदींनी अभिनंदन केले.

## भाजप युवा मोर्चा उत्तर अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी कुणाल बोरुडे



**नेवासा** : तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील युवा कार्यकर्ते कुणाल बोरुडे यांची भारतीय जनता युवा मोर्चा, उत्तर अहिल्यानगर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही घोषणा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी यांनी केली. कुणाल बोरुडे यांनी यापूर्वी भाजप युवा मोर्चाचे तालुका सचिव, तालुका मीडिया संयोजक तसेच जिल्हा सोशल मीडिया सहसंयोजक अशा विविध पदांवर काम करत संघटनात्मक कार्यात सक्रिय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर जिल्हा उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे. या निवडीबद्दल भाजप व युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांकडूनही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. उत्तर अहिल्यानगर जिल्ह्यात युवा मोर्चाची संघटना अधिक मजबूत करून युवकांची मोठी फळी भारतीय जनता पक्षाच्या समर्थनात उभी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष कुणाल बोरुडे यांनी सांगितले.

## काचोळे विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत; गुणवंतांचा सत्कार




**श्रीरामपूर** : रयत शिक्षण संस्थेच्या डी. डी. काचोळे माध्यमिक विद्यालयात नवीन विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या बांधकाम समितीचे चेअरमन प्रकाश पाटील निकम होते. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष व उद्योजक किशोर गदिया, गणेश थोरात, नगरसेविका योगिता नागले, मुख्याध्यापक सुनील साळवे, पर्यवेक्षक सूर्यकांत सराटे आदी उपस्थित होते. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व बिस्किटे देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर बँड व ढोल पथकासह विद्यार्थ्यांची प्रभातफेरी शहरातून काढण्यात आली. या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी वैभवी साळुंके व सिद्धी साळुंके या विद्यार्थिनींनी बेंगळुरू येथे झालेल्या संगीत परीक्षेत नैपुण्य प्राप्त केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्रकाश निकम यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी परिश्रम घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरणही करण्यात आले. सूत्रसंचालन अन्नपूर्णा शिंदे यांनी केले, तर आभार सूर्यकांत सराटे यांनी मानले.

# प्रवरानगरच्या शैक्षणिक कार्यक्रमातून शरद पवारांचे राजकीय टाइमिंग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वे सर्वा शरदचंद्र पवार यांच्या प्रवरानगर दौऱ्याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे. दौऱ्याचे निमित्त शैक्षणिक कार्यक्रमाचे असले तरी या भेटीतून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे जुळविण्याचा प्रयत्न झाल्याचे बोलले जात आहे.



शरद पवार यांनी आपल्या दौऱ्यात कोणतेही थेट राजकीय वक्तव्य केले नाही किंवा आगामी निवडणुकांबाबत भूमिका मांडली नाही. मात्र त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा इतिहास पाहता, त्यांच्या प्रत्येक भेटीमागे आणि प्रत्येक हालचालीमागे दूरगामी राजकीय संकेत दडलेले असतात, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. त्यामुळे प्रवरानगरातील हा दौरा केवळ शैक्षणिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता त्याकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे. आगामी नगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पवार यांनी आपल्या जुन्या व एकनिष्ठ कार्यकर्त्यांना पुन्हा एकत्र आणण्याचा प्रयत्न केल्याचे चित्र दिसून आले. व कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधल्याने त्यांना पुन्हा सक्रिय करण्याचे संकेत मिळाल्याची चर्चा आहे. या दौऱ्यातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे विविध पक्षांतील दिग्गज नेत्यांची एकत्रित उपस्थिती.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे ज्येष्ठ नेते दिलीपराव वळसे पाटील, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात तसेच अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके हे शरद पवार यांच्यासमवेत एकाच वाहनातून प्रवास करताना दिसले. या घटनेने राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, शरद पवार हे थेट भूमिका मांडण्यापेक्षा आपल्या भेटीगाठी, संवाद आणि उपस्थितीतून राजकीय संदेश देण्यात पारंगत आहेत. त्यामुळे प्रवरानगरातील या दौऱ्याचा खरा अर्थ आगामी काही दिवसांत अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

नगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जवळ येत असताना पवार यांच्या या भेटीने अनेक जुन्या कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळाल्याचे बोलले जात असून भविष्यात नव्या राजकीय आघाड्या आणि समीकरणे पाहायला मिळू शकतात. एकंदरीत, शैक्षणिक कार्यक्रमाच्या निमित्ताने झालेला हा दौरा नगर जिल्ह्याच्या राजकारणात आगामी काळात महत्त्वाची भूमिका बजावणारा ठरू शकतो, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगत आहे.

## पद्मश्री पुरस्कार प्राप्त रघुवीर खेडकर यांचा घोडेगाव येथे गौरव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : कला,संस्कृती आणि महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचा अभिमान असलेले सुप्रसिद्ध तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांना केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार बहाल केल्यानंतर त्यांनी नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे सदिच्छा भेट दिली.त्यांच्या या भेटीचा क्षण घोडेगावकरांसाठी आनंद आणि अभिमानाचा ठरला.



घोडेगाव येथील दीपक हिंदू खाणावळ या फर्मच्या जाधव परिवाराशी त्यांचे अनेक वर्षांपासून घनिष्ठ संबंध असल्याने त्यांनी पुरस्कार मिळाल्यानंतर घोडेगावला भेट दिली. यावेळी माजी पंचायत समितीचे सदस्य अरुणकाका जाधव व दीपक जाधव या परिवाराच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या कलासाधनेचा, संघर्षाचा आणि महाराष्ट्राच्या लोककलेला दिलेल्या योगदानाबद्दल गौरव करण्यात आला.

महाराष्ट्राच्या लोककलेचा वारसा जपणाऱ्या अशा कलाकाराचा सन्मान करणे ही घोडेगावकरांसाठी अभिमानाची बाब असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी बोलतांना व्यक्त केली.पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या सदिच्छा भेटीने घोडेगावच्या वातावरणात आनंद, प्रेरणा आणि अभिमानाची भावना निर्माण झाली.

यावेळी दिपक जाधव, अरुणकाका जाधव यांच्या समवेत दादा पाटील दरंदले, विष्णू चौधरी, अमोल जाधव, अशोक सातपुते,शफी शेख, गणेश महाडिक, आरुष जाधव, दादा जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या उपस्थितीने घोडेगावच्या वातावरणात आनंद, प्रेरणा आणि अभिमानाची भावना निर्माण झाली.

## देवळाली प्रवरातील अपघातातील तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे गुहा परिसरासह देवळाली प्रवरा शहरात हळहळ व्यक्त होत आहे. गणेश राजेंद्र जाधव (वय २६, रा. गुहा, ता. राहुरी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी सायंकाळी सुमारे पावणेसहा वाजण्याच्या सुमारास ते दुचाकीवरून देवळाली प्रवरा येथून गुहा गावाकडे जात असताना बागायत पीक सोसायटीजवळ अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. रुग्णवाहिका चालक पप्पू कांबळे यांच्या मदतीने त्यांना राहुरी फॅक्टरी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना गुरुवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. गणेश जाधव यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या गणेश यांच्या अकाली निधनाने परिसरात शोककळा पसरली असून अपघातास कारणीभूत अज्ञात वाहनचालकाचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांचे शिरसगाव येथे स्वागत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्यावतीने नव्याने श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनला रुजू झालेले पोलीस निरीक्षक विशाल खैरे,शिरसगाव येथे नियुक्त झालेले ग्राम महसूल अधिकारी सूर्यकांत रणशूर,तसेच नवीन वायरमन विशाल गवळी,या सर्वांचा सत्कार गणेशराव मुदगुले,सरपंच राणीताई वाघमारे,उपसरपंच संजय यादव सुरेश मूदगुले ग्रामविकास अधिकारी मनीषा तोडमल,सचिन गवारे आदींच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी राजेश यादव,महेश ताके ,बाळासाहेब गवारे,दत्ता यादव ,केदार यादव आदी व सर्व ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.त्यांनी तिन्ही मान्यवरांना शुभेच्छा दिल्या नूतन पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या आगमनाने श्रीरामपूर शहर,शिरसगाव आदी ठिकाणी कायदा,शांतता ,सुव्यवस्था उत्तम प्रकारे राहील अशी अपक्षा सर्वानी केली.नुकताच आगामी उत्सव सण निमित्त शहरात रूटमार्च ,पोलीस पथ संचलन करण्यात आले. त्यासाठी नागरिकांचे सहकार्य अपेक्षित आहे असे पोलीस निरीक्षक विशाल खैरे म्हणाले.

## प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयातील तीन विभागांना पीएच.डी. संशोधन केंद्राची मान्यता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी तसेच उपकरण व नियंत्रण अभियांत्रिकी या तीन विभागांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच.डी. संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे. यापूर्वी महाविद्यालयातील यांत्रिक अभियांत्रिकी विभागामध्ये पीएच.डी. संशोधन केंद्र यशस्वीपणे कार्यरत असून अनेक संशोधकांनी त्याचा लाभ घेत संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

या नव्या मान्यतेमुळे महाविद्यालयाच्या संशोधन क्षेत्रातील वाटचालीला नवे बळ मिळाले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण आणि संशोधनाची नवी दालने खुली झाली आहेत.अशी माहीती प्राचार्य डॉ.संजय गुल्हाने दिली. महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षण, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संशोधनाभिमुख वातावरण, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि उद्योगाभिमुख उपक्रमांच्या बळावर ही मान्यता प्राप्त केली आहे. संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन संस्कृती विकसित करण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि प्राध्यापकांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी सांगितले की, संशोधनाला चालना देण्यासाठी संस्थेमार्फत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आज प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेतील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात मोठ्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

याशिवाय त्यांना विशेष प्रोत्साहनही दिले जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी संशोधनाची नवी दालने खुली करणारी ही मान्यता प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी आणखी एक मानाचा तुरा ठरली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्राधारित शिक्षण, माहिती विज्ञान, सखोल अध्ययन तंत्रज्ञान, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, वस्तूंचे आंतरजाल, पाचव्या आणि आगामी सहाव्या पिढीची दळणवळण प्रणाली, अंतर्भूत प्रणाली, बिनतारी संवेदक जाळे, संगणकीय दृष्टी, काठ संगणन, स्मार्ट आरोग्य व्यवस्था, स्मार्ट कृषी तंत्रज्ञान आणि सायबर-भौतिक प्रणाली या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये संशोधनाला विशेष प्राधान्य दिले जात आहे. उद्योग व संशोधन संस्थांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प, पेटंट, नवोपक्रम आणि तंत्रज्ञान विकासासाठी प्रोत्साहन दिले जात असून जागतिक स्तरावरील तांत्रिक आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम केले जात आहे.

संगणक अभियांत्रिकी विभागामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्राधारित शिक्षण, माहिती विज्ञान, सायबर सुरक्षा, मेघाधारित संगणन, विशाल माहिती विश्लेषण, ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि आधुनिक सॉफ्टवेअर अभियांत्रिकी या क्षेत्रांमध्ये संशोधन व प्रशिक्षण दिले जात आहे. विविध उद्योगसंस्था व माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्प, संशोधन आणि नवोपक्रमाच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित होऊन रोजगारक्षम कौशल्यांमध्ये वाढ होत आहे.

उपकरण व नियंत्रण अभियांत्रिकी विभागामध्ये चौथी औद्योगिक क्रांती, स्मार्ट स्वयंचलन, प्रक्रिया नियंत्रण, यंत्रमानव तंत्रज्ञान, औद्योगिक वस्तूंचे आंतरजाल, प्रगत मापन प्रणाली, स्मार्ट उत्पादन तंत्रज्ञान, डिजिटल प्रतिकृती तंत्रज्ञान आणि औद्योगिक नियंत्रण प्रणाली यांसारख्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये संशोधनाला चालना दिली जात आहे. आधुनिक उद्योगांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना प्रगत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी विभाग सातत्याने कार्यरत आहे.

## अशोक कारखान्याच्या व्हा.चेअरमनपदी निवड झाल्याने झुराळे यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्याची कामधेनु म्हणून संबोधल्या जाणाऱ्या अशोक सहकारी साखर कारखान्याच्या नूतन व्हा. चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल प्रगतशील शेतकरी आदिनाथ पा. झुराळे यांचा टाकळीभान येथील प्रगतशील शेतकरी उत्तमराव पवार यांच्या निवासस्थानी गावातील मान्यवर व ग्रामस्थांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ संपन्न झाला व त्यांना निवडीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी अशोक सह. साखर कारखान्याचे माजी चेअरमन ज्ञानदेव साळूंके, अशोकचे कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, मार्केट कमिटीचे संचालक मयूर पटारे, ग्राम सदस्य सुनील बोडखे, उत्तमराव पवार, विलास दाभाडे, माजी चेअरमन एकनाथ पटारे, आबासाहेब दूस, अशोक पवार, लहानभाऊ पवार, सुभाष ब्राह्मणे, डॉ.किशोर हुळहुळे, भाऊसाहेब पवार, मच्छिंद्र पटारे, सुरेश पवार, विलास सपकळ, संदीप जगताप, संपत कांबळे, गणेश पवार, अमोल पवार, गोरख पटारे, गायकवाड आदी उपस्थितीत होते.




### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु एसआर १५४/२०२६
नेवासा दिनांक १८/०६/२०२६

अर्जदार श्री / श्रीम-युनूस इस्माईल शेख रा. खेडले परमानंद ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. बेगमबी इस्माईल शेख महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म - मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म- मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. बेगमबी इस्माईल शेख, गावाचे नाव-खेडले परमानंद, मृत्यु दिनांक-१९/०३/२०१७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर फारकत

तमाम लोकांस व विशेषतः कळविणेत येते की, श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे, रा. मधलीवाडी पो. ओतूर ता. जुन्नर जि. पुणे यांस कळविण्यात येते की, आमचे अशिल सौ. प्रमिला उर्फ रंजना सचिन घोगरे, द्वारा. नंदु रामु मधे, रा. कोठे बु।। ता. संगमनेर जि.अ.नगर यांचे श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे यांचेबरोबर दि. २३/०३/२०२३ रोजी मु. विजेवहीरा, मधलीवाडी पो. ओतुर ता. जुन्नर जि. पुणे येथे लग्न झालेले आहे. विवाह झाल्यानंतर तुम्ही आमचे अशिलांना एक ते दिड वर्षे चांगले नांदविले. त्यानंतर तुम्ही दारु पिऊन येवुन आमचे अशिलांचे चारित्र्यावर संशय घेत होता. आमचे अशिलाचा शारिरीक व माणसिक छळ केला. आमचे अशिलास तुमचेपासुन एक मुलगी झालेली आहे. तुमच्या दारुच्या व्यसनमुळे सदर मुलीची देखभाल व्यवस्थीत न झाल्यामुळे आजापणामुळे सदरची मुलगी मयत झाली. तरी देखील तुमच्या स्वभावात फरक पडला नाही. तुम्ही आमचे अशिलांना व्यवस्थित नांदवत नव्हता. तुमचा दारु पिऊन मारहाण करणे, संशय घेणे, शिवीगाळ करणे यासारखा शारिरिक व मानसिक छळ वाढतच राहिला. साधारणपणे डिसेंबर २०२४ मध्ये आमचे अशिलांना एका वस्त्रानिशी घराबाहेर काढुन दिले. तेव्हापासुन आमचे अशिल तुमच्यापासुन स्वतंत्र राहुन अश्रीतासारखे जीवन जगत आहे. अनेकदा मध्यस्थी, नातेवाईकांमार्फत प्रयत्न करुनही तुम्ही आमचे अशिलास नांदवत नाही. आमचे अशिलाने तुम्हास संपर्क साधला असता, तुम्ही आमचे अशिलांना नांदविण्यास स्पष्टपणे नाकारले. अशाप्रकारे तुम्ही- श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे स्वतःहुन आमचे अशिलांचा त्याग केलेला आहे. आमचे अशिल हे तरुण असुन त्यांना तुमचेबरोबर सुखाने संसार करण्याची प्रामाणिकपणे इच्छा आहे, ती तुम्ही- श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे हे पुर्ण करणार नाही अशी आमचे अशिलांची पुर्णपणे खात्री झालेली आहे.

सबब या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे यांना जाहिर फारकत (नवरा बायकोचे नातेसंबंध संपुष्टात आणणेकामी) देत आहेत. आमचे अशिल व श्री. सचिन उर्फ भाऊसाहेब देवराम घोगरे हे दुसरा घरोबा करण्यास पुर्णपणे मोकळे झाले आहेत ही जाहिर फारकत दिली असे. ता.२५/०६/२०२६.

**ॲड.एस.ए.हासे पाटील**
**ॲडव्होकेट**


# स्वस्त धान्य दुकानदारांच्या न्यायासाठी आ. खताळ यांची विधानसभेत मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यासह महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानदारांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंमलबजावणी दरम्यान विविध प्रशासकीयव तसेच आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून या समस्यांमुळे वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे.

या सर्व प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून दुकानदारांना न्याय द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात उपस्थितीत केली. शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वितरणावेळी वाहनाची टी.पी. (ट्रान्सपोर्ट परमिट) व परमिटची प्रत दिली जात नाही. त्यामुळे धान्य प्राप्तीचा अधिकृत पुरावा दुकानदारांकडे उपलब्ध राहत नाही. शासनाने ही कागदपत्रे नियमितपणे उपलब्ध करून द्यावीत. तसेच थेट धान्य वितरण योजनेअंतर्गत रिकामे बारदान वजा करून पूर्ण वजनाचे धान्य प्रत्यक्ष वजन करून देण्यात यावे.



तसेच कोविडच्या काळात अनेक दुकानदारांनी चलनाद्वारे रक्कम भरून घेतलेल्या धान्याचे शासनाच्या आदेशानुसार मोफत वितरण केले होते. मात्र त्याची परतफेड अद्याप झालेली नसल्याची बाब त्यांनी सभागृहात मांडली. संबंधित दुकानदारांना थकीत रकमेचा परतावा तातडीने देण्यात यावा, कोविड काळात वितरित करण्यात आलेल्या धान्यावरील मार्जिन 'कॅरी फॉरवर्ड' या कारणास्तव अनेक दुकानदारांना मिळालेले नाही.

त्यामुळे प्रलंबित मार्जिनची रक्कम तात्काळ अदा करण्यात यावी गोदामातून मिळणाऱ्या धान्याच्या गोण्या अनेकदा फाटलेल्या अवस्थेमध्ये असतात तसेच काही गोण्यांमध्ये वजन कमी असल्याचे आढळून येते. परिणामी दुकानदारांना धान्य तुटीचा फटका बसतो. तसेच धान्य वाहतुकी दरम्यान काही ठिकाणी हमालांकडून अवैध स्वरूपात रकमेची मागणी होत असल्याच्या तक्रारी आहेत. या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही आमदार खताळ यांनी केली.

काही महिन्यां पासून ई-पॉस मशीनमधील फिंगर प्रिंट स्कॅनर व्यवस्थित कार्यरत नसल्याने लाभार्थी व दुकानदारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे धान्य वितरण प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होत असून या यंत्रणेमध्ये तातडीने सुधारणा करण्यात यावी, असे हीं आमदार खताळ यांनी सभागृहात सांगितले.

प्राधिकारपत्र नूतनीकरणाच्या प्रक्रियेत फूड लायसन्सची सक्ती रद्द करण्यात यावी. संस्था व बचतगटांकडून बँक स्टेटमेंट व लेखापरीक्षण अहवाल सादर केला जात असल्यामूळे नोंदणी कार्यालयाच्या स्वतंत्र दाखल्याची अट शिथिल करण्यात यावी, अशी मागणीही केली. हा विषय सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी संबंधित असून हजारो लाभार्थी व स्वस्त धान्य दुकानदारांच्या हिताचा आहे. त्यामुळे शासनाने या सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित प्रश्न मार्गी लावावेत, अशी जोरदार मागणी आ. अमोल खताळ यांनी विधिमंडळात केली.

## पान १ वरुन

### खा. संजय दिना पाटलांच्या वक्तव्यावर मुख्यमंत्री नाराज

या प्रकरणाची त्यांनी कठोर शब्दांत निंदा केली आहे. अशा खासदारांना कठोर शब्दांत समज द्यायला हवी, असेही फडणवीस यावेळी म्हणाले आहेत. गेल्या वर्षभरात काय काय घडलं, कोणी काय काय विधानं केली याचा पाढाही त्यांनी वाचून दाखवल्याचे समजते. तसेच महायुतीमध्ये अशा प्रकारची विधानं खपवून घेतली जाणार नाहीत. पत्रकारांबाबत अशा प्रकारची भाषा खपवून घेतली जाणार नाही. अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही फडणवीस यांनी दिल्याचे सांगितले जात आहे.पत्रकारांची जाहीर माफी मागावी.

### नसरापूरच्या दोषी नराधमाला २९ जूनला शिक्षा सुनावणार

घटनेमुळे धक्क्यात असल्याचा आणि तो ६५ वर्षांचा वृद्ध असल्याचा युक्तीवाद केला. तो वृद्ध असल्याने इतका क्रुर गुन्हा करु शकतो का? असाही आरोपीच्या वकिलांनी युक्तिवाद केला आणि जन्मठेप योग्य शिक्षा राहील असा दावा केला.

आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी असं सरकारी वकिलांकडून सांगण्यात आलं आहे. तर ज्या ज्या कलमांखाली खटला चालला ते सर्व गुन्हे सिद्ध झाले आहेत. त्यापैकी दोन गुन्ह्यांमधे फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे. एका गुन्ह्यात आजन्म जन्मठेपेची तर एका गुन्ह्यात १४ वर्षाच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे. तर कोर्टात सुनावणीवेळी न्यायाधीशांनी दोषी ठरवलं तेव्हा भीमराव कांबळेच्या चेहऱ्यावरची रेषही हलली नाही. परिणामी 'हा सुधारण्याच्या पलीकडे गेलाय, समाजासाठी घातक' असल्याचा दावा करत कठोरात कठोर कारवाईची मागणी सरकारी वकीलांकडून करण्यात आली आहे.

### शनिशिंगणापूर देवस्थान विश्वस्त नियुक्ती प्रलंबित प्रकरण

कायद्याच्या चौकटीत बसत नसल्याचे नमूद करून ती अवैध ठरवली. या निर्णयामुळे तत्कालीन विश्वस्त मंडळाला मोठा दिलासा मिळाला होता. मात्र, उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. राज्य सरकारसह देवस्थानचे प्रशासक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने विशेष अनुमति याचिका (डड्झ) दाखल करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने १९ डिसेंबर २०२५ रोजी प्राथमिक सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली. तसेच देवस्थानच्या आर्थिक व्यवहारांबाबत आणि प्रशासनाच्या सातत्याबाबत चिंता व्यक्त करत नाशिक विभागीय आयुक्तांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. त्यानंतर देवस्थानचा संपूर्ण कारभार प्रशासकीय नियंत्रणाखाली सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या नोंदीनुसार या प्रकरणात महाराष्ट्र शासन, श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे प्रशासक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी हे याचिकाकर्ते असून, तत्कालीन विश्वस्त मंडळातील २२ सदस्य प्रतिवादी आहेत. त्यामुळे हा वाद केवळ व्यक्तीगत नसून देवस्थानच्या प्रशासनिक नियंत्रण आणि कायदेशीर अधिकारांशी निगडित असल्याचे स्पष्ट होते. आता १४ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालय कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायालयाचा अंतिम निर्णय देवस्थानच्या भविष्यातील प्रशासनाची दिशा ठरविणारा ठरणार आहे. याचबरोबर श्री शनैश्वर देवस्थान अधिनियम २०१८ अंतर्गत नवीन विश्वस्त मंडळाची नियुक्ती कधी होणार, याबाबतही भक्त आणि स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. देवस्थानच्या आर्थिक पारदर्शकतेपासून ते विकासकामांपर्यंत अनेक महत्त्वाचे मुद्दे या प्रकरणाशी संबंधित असल्याने आगामी सुनावणी शनिशिंगणापूर देवस्थानच्या भविष्यासाठी निर्णायक मानली जात आहे. राज्यातील प्रमुख धार्मिक संस्थांच्या प्रशासनासंदर्भातील हे एक महत्त्वाचे प्रकरण म्हणूनही या सुनावणीकडे पाहिले जात आहे.

### ट्रॅक्टर भाड्याने घेवून परस्पर विल्हेवाट लावणारा आरोपी जेरबंद

परस्पर विल्हेवाट लावत विश्वासघात केल्याचे समोर आले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी तपास पथकाला संशयित आरोपीचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. पथकाने शोधमोहीम राबवून मल्हार जायभाये याला अटक केली. त्याच्याकडून फिर्यादीचा ट्रॅक्टर हस्तगत केला. तपासादरम्यान संशयित आरोपीकडे अधिक चौकशी केली असता त्याने आणखी एक फसवणूक केल्याचे उघड झाले. फसबुकवरील पोस्टच्या माध्यमातूनच प्रदीप काशिनाथ जगताप (रा. भरगाव, ता. वैजापूर) यांच्याशी संपर्क साधून त्यांचाही विश्वास संपादन करत ट्रॅक्टर लंपास केला होता. तो ट्रॅक्टरही पोलिसांनी जप्त केला. सदरची कारवाई स.पो.नि. हेमंत थोरात यांचे मार्गदर्शनाखाली स. फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. शैलेश रोहोकले, पो.हे.कॉ. राजू सुद्रीक, पो. कॉ. दिपक फुंदे, पो. कॉ. नवनाथ दहिफळे, पो.कॉ. किशोर जाधव, पो.कॉ. राहुल गुंडु, पो.कॉ. अरुण सांगळे यांचे पथकाने केली आहे.

# दिव्यांग बांधवांना मोफत कृत्रिम अवयव व साहित्य वाटप शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : मतदारसंघातील दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी आ. आशुतोष काळे सातत्याने प्रयत्न करीत आहे. कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साहित्य वाटप शिबीर हा त्याचाच एक भाग असून यामुळे अनेक गरजू दिव्यांग बांधवांचे जीवन सुखकर झाले आहे. असे प्रतिपादन कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रविण शिंदे यांनी केले आहे.

शारीरिक अपंगत्वावर मात करून दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती मुंबई व आ. आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून कोपरगाव मतदार संघातील दिव्यांग बंधू भगिनींना मोफत कृत्रिम



अवयव आणि सहाय्यक साहित्य वाटप शिबिराचे उद्घाटन गुरुवार (दि.२५) रोजी सकाळी १० वाजता कोपरगाव येथील महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टच्या सभागृहात कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रविण शिंदे व इतर मान्यवरांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते.

या शिबिराला उपस्थित असलेल्या दिव्यांग बंधू-भगिनींची सकाळी १० ते दु. ५ वाजेपर्यंत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. संपूर्ण दिवसभरात शेकडो दिव्यांग बांधवांची तपासणी झाली असून ज्या दिव्यांग बंधू भगिनींना कृत्रिम अवयवांची गरज आहे. अशा दिव्यांगांना कृत्रिम अवयव अचूक बसावे याकरिता तज्ज्ञ डॉक्टरांकडून अचूक हाता-पायाच्या कृत्रिम अवयवाचे मोजमाप घेण्यात आले असून उपस्थित दिव्यांग बंधू भगिनींची नोंदणी देखील करून घेण्यात आली. या दिव्यांग बांधवांना शुक्रवार (दि.२६) रोजी दुपारी २ वाजता आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते कृत्रिम अवयवांसह व्हीलचेअर, ट्रायसिकल, कुबड्या, स्टिक, वॉकर, श्रवणयंत्र आदी सहाय्यक साहित्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

अनेकदा आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे गरीब व गरजू दिव्यांगांना महागडे कृत्रिम अवयव, व्हीलचेअर किंवा इतर आधुनिक साधने खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांचे जीवन परावलंबी बनते आणि दैनंदिन जीवन जगताना त्यांना सतत दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागते. दिव्यांग बांधवांची हीच मोठी अडचण ओळखून आमदार आशुतोष काळे यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून या शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराच्या माध्यमातून मतदारसंघातील शेकडो गरजवंत दिव्यांगांना थेट मदत पोहोचवून त्यांच्या अंधारमय जीवनाला एक नवी उमेद आणि नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे उद्योगसमूह व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे अधिकारी व दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग व शिविगाळ प्रकरणी दोघांवर पोस्को

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**गंगापूर** : तालुक्यातील नवाबपुरवाडी परिसरात एका १६ वर्षीय अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनीवर लैंगिक हेतूने विनयभंग, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी गंगापुर पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २४ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास पीडित मुलगी नवाबपुरवाडी ते गंगापुर रोडलगत शिवारात शौचालयास जात असताना आरोपी प्रदीप सुर्यभान जाधव याने जाणूनबुजून तिचा हात पकडून लैंगिक हेतूने अयोग्य स्पर्श करत तिचा विनयभंग केला.

घटनेनंतर पीडित मुलगी तिच्या दोन आजींसोबत आरोपीच्या घरी 'असे का केले' याची विचारणा करण्यासाठी गेली असता, आरोपी प्रदीप जाधव व त्याची पत्नी पूजा प्रदीप जाधव या दोघांनी संगनमत केले. त्यावेळी आरोपींनी पीडितेला व तिच्या आजींना 'छिनाल, भिल्लट्यानो' अशा जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच आरोपी प्रदीपने पीडित मुलीला परत इकडे आलीस तर तुझ्या कानामागे ओढीन अशी धमकीही दिली.

या गंभीर प्रकारानंतर पीडितेने दि. २४ जून रोजी गंगापुर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) विनायक पाटील यांनी फिर्याद दाखल केली असून, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे हे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## द्रोणा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे सीईटी परीक्षेत यश



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सीईटी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून संस्थेचे नाव उज्वल केले आहे. विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाले. साई भरत ढोकचवळे यांने ९७.५७ गुण मिळवत उत्तुंग कामगिरी केली.

यावर्षी अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण मिळवत अभियांत्रिकी व व्यावसायिक शिक्षणाच्या प्रवेशासाठी आपली पात्रता सिद्ध केली. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेत आयोजित करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच भविष्यातही अधिक मेहनत घेऊन उच्च शिखरे गाठण्यासाठी सर्वांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. द्रोणा अकॅडमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी विद्यार्थी घडवत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## स्टेट बँकेच्या रक्तदान शिबिराला चांगला प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर्धापन दिनानिमित्त बँकेच्या राहुरी येथील शाखेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . त्याला चांगला प्रतिसाद मिळाला .दिनांक एक जुलै रोजी स्टेट बँकेचा वर्धापन दिन असून या निमित्ताने दि . २५ जून रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले . स्टेट बँकेच्या राहुरी शाखेत संपन्न झालेल्या रक्तदान शिबिरात अनेक ठेवीदार , खातेदारांनी बँकेच्या या उपक्रमाचे स्वागत केले . संगमनेर येथील अर्पण रक्त संकलन केंद्रच्या सुजाता वाघचौरे, लक्ष्मी माळी, साक्षी जागनर, रसिका रोहंगले यांनी रक्तदान प्रक्रियेत सहभाग घेतला व जनजागृतीही केली. स्टेट बँकेच्या राहुरी शाखेचे शाखाधिकारी सुनील पवार यांच्यासह बँकेचे वीरेंद्र पांडेय, अतुल बंगाळ, अंजुम पठाण, वंदना वाघ, मयुरी बेल्हेकर,स्नेहा महाकुलकर, अमृता गायकवाड, कोमल गोपाळे , विद्या घेंबुड , रवींद्र जगताप , राहुल गावडे , सिद्धार्थ जगताप, प्रसाद मैड, राजेंद्र परदेशी, शिवम मैड, किरण उदावंत , आदी उपस्थित होते .



## निधन वार्ता

### रंजनाबाई शेंडगे



**अहिल्यानगर** : बागरोजा हडको येथील रहिवासी श्रीमती रंजनाबाई छगनराव शेंडगे( वय ८० ) यांचे गुरुवार (दि. २५ जून ) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे चार मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. माजी महापौर रोहिणी संजय शेंडगे यांच्या सासू तर नगरसेवक संजय व संदीप, सुनील, विनोद शेंडगे यांच्या त्या मातोश्री होत.

### Change of name

Old name: FARIDA MOHAMMADRAFIK SHAIKH IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is FARIDA RAFIK SHAIKH as on Aadhar Card Number is [5837-5549-3843] (25/06/2026)

### Change of name

Old name: MOHAMMADRAFIK MOHAMMADHANIF SHAIKH IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is RAFIK HANIF SHAIKH as on Aadhar Card Number is [3643-2104-2673] (25/06/2026)

### नावात बदल

मी माझे नाव अहिरे व्यंकटेश सुरेश वरून व्यंकटेश सुरेश अहिरे असे बदलत आहे ,ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून इतर कोणत्याही व्यक्तीशी त्याचा संबंध नाही .यापुढे सर्व शासकीय कायदेशीर तसेच सर्व व्यवहारासाठी मला व्यंकटेश सुरेश अहिरे या नावाने ओळखले जाईल.

प्रतिज्ञापत्र

क्र- २६५२२४२०४१२६८१००६८१०३१

दिनांक २९/०५/२०२६

## महालगाव जि. प. प्राथमिक शाळेला तीन संगणक संचांची भेट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा संगणकीकृत व्हावी या उद्देशाने भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेच्या वतीने महालगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला दि. २५ रोजी तीन संगणक संच भेट देण्यात आले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात बोलताना भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे अध्यक्ष डॉ. जे. के. जाधव यांनी तालुक्यातील महिलांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी प्रत्येक घरातील महिलांना पैठणी साडी निर्मितीचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच शेतकरी कुटुंबातील मुलांना आधुनिक शेतीसाठी उपयुक्त ठरणारे ड्रोन प्रशिक्षण देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य सुनिल पैठण पगारे, माजी पंचायत समिती सदस्य भाऊसाहेब झिंजुर्डे, पंचायत समिती सदस्य सौ. शितल राहुल आल्हाट, सरपंच सौ. रोहिणी नानासाहेब काळे देविदास सामसे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास बनकर, उपाध्यक्ष बापुसाहेब शेळके, कैलास शेळके, मच्छिंद्र आल्हाट, सोमनाथ झिंजुर्डे, शिरीष चव्हाण, प्रा. शिवाजी मोरे, प्रा. प्रमोद डुकरे, मुख्याध्यापक विजय शिनगारे, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वजनापूर ग्रामपंचायतीत एकल महिला दिवस साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील वजनापूर ग्रामपंचायतीमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त''एकल महिला दिवस'' उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.वजनापूर ग्रामपंचायतीचे सरपंच शिवम जाधव, मुख्य सेविका हर्षल जाधव, ग्रामपंचायत अधिकारी देवरे, अंगणवाडी सेविका ज्योती जाधव, सुमैया पठाण, रोहिणी जाधव, अंगणवाडी मदतनीस, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. बैठकीमध्ये एकल, विधवा व निराधार महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, बालसंगोपन योजना तसेच इतर शासकीय कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वावलंबी बनावे, तसेच आपल्या हक्काच्या योजनांसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



## तहसील कार्यालयातील कथित गैरकारभाराची चौकशी करा ; मुसा शेख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर,** गंगापूर तहसील कार्यालयातील जमा/२ विभागात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या कोतवालाच्या कथित गैरकारभाराची उच्चस्तरीय चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच त्याची तत्काळ सज्जावर बदली करावी, अशी मागणी धाडस सामाजिक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष मुसा शेख यांनी केली आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, जमा/२ विभागात फेरफार, वारस नोंदी, जमीन खरेदी-विक्री, वाटणी, सीमांकन व महसुली वादांशी संबंधित अनेक महत्त्वाची प्रकरणे हाताळली जातात. मात्र या विभागातील अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित असून शेतकऱ्यांना वारंवार तारखा दिल्या जात असल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे.

तसेच संबंधित कोतवालाच्या मनमानी कारभारामुळे गुणवत्तेच्या आधारे निर्णय न होता आर्थिक व्यवहारांवर प्रकरणे निकाली काढली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून खातेदार शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा शेतकऱ्यांसह जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मुसा शेख यांनी दिला आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि .२६ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९ २३९ ५९० | ४-५ | २३० ७८० ६९० | जोड ४६-९५-१०-२७-५८ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-१ | १४६ १२८ ११९ | जोड ३०-७१-२५५-९८-१६ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० २२८ | २-० | १९० २८० २४४ | जोड २१-७०-३८-६४-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 5 | |

# आषाढी वारी निमित्त वारकऱ्यांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : आषाढी वारी निमित्ताने गंगापूर शहरातून व तालुक्यातील विविध गावांमधून संतांच्या पालख्या, दिंड्या व मोठ्या संख्येने वारकरी भाविक पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी गंगापूर तालुक्यातील प्रमुख वारी मार्गांवर आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशी मागणी रुग्ण कल्याण समिती सदस्य अतुल प्रकाश रासकर यांनी निवेदनात केली आहे.



गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक व तालुका आरोग्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गंगापूर तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर वारकरी जात असल्याने आरोग्य विभाग, नगरपरिषद,ग्रामपंचायत व संबंधित प्रशासनाने समन्वयाने नियोजन करून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात वारकरी भाविकांसाठी तात्पुरते आरोग्य तपासणी केंद्र, प्रथमोपचार सुविधा, आवश्यक औषधसाठा, वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांची पथके तैनात करून उष्माघात, थकवा, सर्दी-ताप, पायाला होणाऱ्या जखमा आदी आरोग्य समस्यांसाठी रुग्णवाहिका सेवा सज्ज ठेवण्याची मागणी अतुल रासकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

द • ख • ल

## सीए फायनल उत्तीर्ण; आदित्य खरदासचे यश



**अहिल्यानगर :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया तर्फे मे २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत अहिल्यानगरच्या आदित्य संजय खरदास याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवत चार्टर्ड अकाउंटंट (सीए) होण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे शहरासह विविध स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आदित्यने यापूर्वी सीए फाउंडेशन तसेच सीए इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षाही पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करून आपल्या सातत्यपूर्ण मेहनतीची आणि गुणवत्तेची छाप पाडली होती. आता सीए फायनल परीक्षेतही प्रथम प्रयत्नात यश मिळवत त्याने आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. आदित्यचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण बाई ईचरज बाई व भाऊसाहेब फिरोदिया विद्यालय, अहिल्यानगर येथे झाले. त्यानंतर अकरावी व बारावीचे वाणिज्य शाखेचे शिक्षण त्याने न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे पूर्ण केले. आदित्य हा कै. किसन चंद्रय्या खरदास, सहकार खात्यातील सेवानिवृत्त ऑडिटर यांचा नातू आहे. तसेच पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम खाते कर्मचारी सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर येथील वरिष्ठ लिपिक संजय किसन खरदास आणि श्री मार्कंडेय विद्यालय, अहिल्यानगर येथील शिक्षिका रेणुका संजय खरदास (दासरी) यांचा सुपुत्र आहे.

## पतीला फोन का केला? तरुणीसह कुटुंबाला मारहाण

**अहिल्यानगर :** पतीला फोन केल्याच्या कारणावरून वाद घालत एका तरुणीच्या घरात घुसून तिला, तिच्या आईला आणि बहिणीला लाथाबुक्यांनी जबर मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना वडारवाडी, भिंगार येथे घडली असून याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निकिता आशुतोष टाक, राखी रवींद्र बनसोडे आणि गणेश कुशाबा पाठक अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी तिच्या कुटुंबासह वडारवाडी परिसरात राहते. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास तिन्ही आरोपींनी संगनमत करून पीडित तरुणीच्या घरात अनाधिकाराने प्रवेश केला. घरात घुसताच आरोपींनी 'माझ्या पतीला पुन्हा फोन केला तर तुझ्याकडे पाहून घेईन' अशी धमकी देत वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका वाढला की आरोपींनी पीडित तरुणी, तिची आई आणि तिची बहीण यांना अद्वातद्वा शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी पीडित तरुणीच्या हातातील महागडा आयफोन जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि तिथून पळ काढला. या घटनेनंतर पीडित कुटुंबाने थेट पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून तात्काळ भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत.

## केडगावमध्ये रस्त्याच्या वादातून शेतकरी कुटुंबावर प्राणघातक हल्ला

**अहिल्यानगर :** केडगाव येथील कोतकर मळा परिसरात सामाईक रस्त्याच्या कारणावरून दोन गटात रक्ताळलेला थरार घडला आहे. जुन्या वादाची कुरापत काढून शेती व्यवसाय करणाऱ्या एका ज्येष्ठ नागरिकाच्या कुटुंबावर शेजाऱ्यांनीच प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात चाकू, लाकडी दांडके आणि दगडांचा वापर करण्यात आला असून, पीडित कुटुंबाला गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सहादु किमन कोतकर (वय ६० वर्ष) हे आपल्या कुटुंबासह कोतकर मळा परिसरात राहत असताना हा प्रकार घडला. सामाईक रस्त्यावरून जात असताना आरोपी माऊली उर्फ ज्ञानेश्वर कोतकर, ऋतुजा ज्ञानेश्वर कोतकर, सुमन उर्फ बबई यादव कोतकर आणि ऋषीकेश यादव कोतकर यांनी त्यांना रस्त्यात अडवले. तुम्ही सर्वजण इथे कसे राहता तेच मी पाहतो, अशी धमकी देत आरोपींनी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की आरोपी माऊली याने चाकू सारख्या धारदार शस्त्राने फिर्यादींवर वार केले. तर ऋषीकेश याने लाकडी दांडक्याने फिर्यादी आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केली. इतर आरोपींनी दगडाने मारहाण करत लाथाबुक्क्यांनी गंभीर जखमा केल्या. या संपूर्ण झटापटीत पीडित कुटुंबातील सदस्यांचे दागिनेही गहाळ झाले आहेत. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्या जबाबावरून कोतवाली पोलिसांनी तात्काळ गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विश्वास गाजरे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अभ्यासाची गरज : वायदंडे

**कासार पिंपळगाव :** प्राध्यापकांनी आपले ज्ञान सतत अद्ययावत ठेवून संशोधन, गुणवत्ता वृद्धी आणि विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धतींचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे. तसेच उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलत्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी अशा प्रशिक्षण केंद्रांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे मत डॉ. देविदास वायदंडे यांनी व्यक्त केले. पाथर्डी तालुक्यातील आदिनाथनगर येथील दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालयात आ. मोनिका राजळे यांचे मार्गदर्शनानुसार प्राध्यापक प्रशिक्षण केंद्र आणि सामाजिकशास्त्र मंडळ या उपक्रमांचे उद्घाटन डॉ. देविदास वायदंडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अध्यक्षीय सूचना डॉ. रोहित आदलिंग यांनी तर अनुमोदन डॉ. आसाराम देसाई यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी करून महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या शैक्षणिक व संशोधन क्षमतावृद्धीसाठी प्रशिक्षण केंद्राची गरज अधोरेखित केली. तसेच सामाजिकशास्त्र विषयांवरील अभ्यास, संशोधन व विविध उपक्रमांना चालना देण्यासाठी सामाजिकशास्त्र मंडळाची स्थापना करण्यात आल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दादापाटील राजळे शिक्षणसंस्थेचे नितीन शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर गायकवाड यांनी तर डॉ. राजू घोलप यांनी आभार मानले.

## दादर प्रमाणे पार्किंग व्यवस्था अहिल्यानगर मनपाने अवलंबावी : बोज्जा

**कासार पिंपळगाव :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पार्किंग बाबत सुचवलेली सूचना मुंबई महानगरपालिकेने दादर मध्ये अवलंबिली त्या प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेने ही अवलंबावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास बोज्जा यांनी एका पत्रकानव्ये केली आहे. सध्या अहिल्यानगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात रस्त्यावर व इतरत्र कोठेही नागरिकांनी आपली दुचाकी व चारचाकी गाडी पार्किंग केल्यास मोठा दंड आकरले जाते . वास्तविक पाहता नागरिकांना आपली गाडी कुठे पार्क केली तर दंड आहे व कोठे पार्क केली तर दंड नाही याची माहिती नाही व तसे महानगरपालिकेनेही कोणतेही सूचना फलक लावले नाही त्या मुळे नागरिकांना विनाकारण मोठे आर्थिक भुर्दंड सोसावे लागते, या साठी नुकतेच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्य सरकार व मुंबई महानगरपालिकेला आवाहन केल्या प्रमाणे दादर मध्ये अंमलबजावणी केली.

# कल्याण रोड परिसरातील रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## आठ दिवसांत कचऱ्याचा प्रश्न मार्गी न लागल्यास आयुक्तांच्या दालनात तीव्र आंदोलन : ॲड. युवराज शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील कल्याण रोड परिसर हा झपाट्याने विकसित होत असलेला निवासी भाग असून या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र, महानगरपालिकेच्या घंटागाडीचे नियोजन विस्कळीत झाल्याने आणि नियमित वेळेत कचरा संकलन होत नसल्यामुळे नागरिकांकडून रस्त्यांच्या कडेला ठिकठिकाणी कचरा टाकला जात आहे. परिणामी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.

विशेषतः उद्धव अकॅडमी शाळेसमोरील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना दुर्गंधी आणि अस्वच्छ वातावरणाचा सामना करावा लागत असून पालकांमध्येही तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते ॲड. युवराज शिंदे यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत महानगरपालिका प्रशासनावर टीका केली आहे. ते म्हणाले की, कल्याण रोड परिसरात नव्याने तयार करण्यात आलेल्या डीपी रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे पूर्ण झाली असली तरी स्वच्छतेच्या बाबतीत प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. विश्व मॉलच्या पाठीमागील भागात मोठा कचऱ्याचा ढीग निर्माण झाला असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यावेळी बोलताना ड. युवराज शिंदे म्हणाले की, कल्याण रोड परिसरात नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यामुळे घंटागाडीचे नियोजन वेळेवर होणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक वेळा घंटागाडी



नियोजित वेळेत येत नसल्याने नागरिकांना पर्याय नसल्यामुळे रस्त्याच्या कडेला कचरा टाकावा लागतो. परिणामी ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग निर्माण झाले आहेत. ही परिस्थिती तातडीने बदलणे गरजेचे आहे.

ते पुढे म्हणाले की, रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवरही महानगरपालिकेने दंडात्मक कारवाई करावी. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही आहे. मात्र, त्यासाठी महानगरपालिकेनेदेखील आपली जबाबदारी पार पाडत घंटागाडीचे योग्य नियोजन करावे आणि वेळेवर प्रत्येक नागरिकाच्या दारापर्यंत सेवा पोहोचवावी.

महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पुढील आठ दिवसांत कल्याण रोड परिसरातील कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा आयुक्तांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ड. युवराज शिंदे यांनी दिला आहे.

## कर्मयोगी काकडे हे देशव्यापी व्यक्तिमत्व : डॉ. भापकर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री




**शेवगाव :** आबासाहेबांनी फुले, शाहू, आंबेडकर यांच्या प्रमाणेच शेतकरी, कष्टकरी, दीनदलित, गोरगरीब यांच्यासाठी आपले आयुष्य खर्च केले. आबासाहेबांचा हा जनहिताचा वारसा आज ॲड. विद्याधर काकडे व सौ.हर्षदा काकडे मोठ्या नेटाने पुढे चालवत असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी शेवगाव येथे केले.

आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे संस्थापक कर्मयोगी जगन्नाथ कान्होजी उर्फ आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती कार्यक्रम आबासाहेब काकडे विद्यालय, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शेषराव देशपांडे, ॲड. डॉ. विद्याधर काकडे, हर्षदाताई काकडे, डॉ.लक्ष्मण बिटाळ, अशोक तमनर, नवनाथ काटे, डॉ. सुरेश पाटेकर, डॉ. भागिनाथ काटे, जगन्नाथ गावडे, सुमनताई गावडे, लक्ष्मण गवळी, विजय मुधोळकर मान्यवर उपस्थित होते. शेषराव देशपांडे म्हणाले की, आबासाहेबांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शाळा, वसतिगृहे चालवली. कर्म हीच पूजा मानून त्यांनी आपले जीवन समाजासाठी खर्च केले. आबासाहेबांविषयीच्या स्वतः च्या काही आठवणीही यावेळी त्यांनी सांगितल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ यांनी सूत्रसंचालन प्रा. जरीना शेख यांनी तर समारोप 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताने झाला. कार्यक्रमास संस्थेतील आजी-माजी प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## अहिल्यानगरमध्ये मोहरमनिमित्त चोख बंदोबस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यामध्ये मोहरम उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. आज मोहरमची नववी असल्याने ही रात्र 'कत्तलची रात्र' म्हणून ओळखली जाते. या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने सुरक्षेत मोठी वाढ केली आहे. आज निघणाऱ्या मुख्य मिरवणुकांसाठी प्रत्येक चौकाचौकात मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सोशल मीडियासह संशयित हालचालींवर पोलीस बारीक लक्ष ठेवून आहेत. मिरवणूक मार्गावरील उंच इमारतींवरून दुर्बिणीद्वारे नजर ठेवली जात असून, ड्रोन कॅमेरे आणि फिरत्या कॅमेऱ्यांचाही वापर केला जात आहे. वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक त्या ठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनुचित प्रकार आढळल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### असा आहे पोलीस बंदोबस्त

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरात कडक पहारा ठेवण्यात आला आहे. यामध्ये २ अप्पर पोलीस अधीक्षक, ५ पोलीस उपाधीक्षक, १७ पोलीस निरीक्षक, ५० सहायक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ६५० पोलीस कर्मचारी, एसआरपीएफच्या ३ कंपन्या, आरसीबीच्या २ प्लाटून आणि १५० होमगार्ड असा मोठा फौजफाटा मिरवणूक मार्गावर तैनात आहे. पोलीस अधीक्षक स्वतः या संपूर्ण व्यवस्थेवर लक्ष ठेवून आहेत.

## नुतन संचालकांचा सत्कार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** श्री मारुतरावजी घुले पा शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता. शेवगाव विद्यालयात लोकनेते मारुतरावजी घुले पा. ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना ज्ञानेश्वरनगर भेंडा ता. नेवासा संचालकपदी पंडित भोसले तसेच बाळासाहेब खरड यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल विद्यालयात सत्कार केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शिंदे होते. या प्रसंगी लोकनेते मारुतरावजी घुले पा. यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मुख्याध्यापक इंगावले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विद्यालयाच्यावतीने इंगावले यांनी पंडित भोसले व बाळासाहेब खरड यांना गौरविण्यात आले. या प्रसंगी मा. सरपंच कंलीदंर चाचा, बाळासाहेब शिंदे, पोलीस पा., बाळू सिंग मुराडे, कल्याणराव भोसले, नंदु भोसले निसार भाई, राजु मगर, वाघमोडे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पंडित भोसले म्हणाले की, डॉ. नरेंद्र घुले यानी ज्या विश्वासाने मला संचालक पदावर काम करण्याची संधी देऊन जी जबाबदारी दिली आहे. मी समर्थपणे पूर्ण करुन माझ्या गटातील शेतकरी व कामगार यांच्या सदैव पाठिशी उभे राहून त्यांना कोणतीही अडचण येऊ देणार नाही. मी सदैव डॉ. नरेंद्र घुले यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत राहिन.

हा सन्मान केवळ माझा नसुन माझ्या प्रत्येक कार्यकर्त्यांचा आहे. असे सांगून आभार व्यक्त केले. नंदु भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बाळासाहेब शिंदे यांनी पंडित भोसले यांच्या कार्याविषयी माहिती सांगून त्याच्या प्रामाणिकपणे केलेल्या कार्याची पावती म्हणून कारखान्याच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली. या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. या प्रसंगी बाळासाहेब शिंदे यांनी विद्यालयाला सर्व वर्गात डस्टबिन व दळवी भगिनींना वह्यांचा सेट दिला. विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, विकास राऊत, विशाल जोशी, प्रमिला बोडखे, यशोदास वाघमारे, रणजित जाधव, भाऊसाहेब बर्डे, राजाराम लिंभोरे, देविदास आरगळे पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.




## आबासाहेबामुळे शिक्षणाची गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहचली : हभप निकम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव :** कर्मयोगी आबासाहेब काकडे ज्या काकडे कुटुंबात जन्मले त्या काकडे घराण्याला महान साधू-संतांचा सहवास लाभला यातून विद्यादान हे सर्वश्रेष्ठ दान आहे हे मनाशी बाळगून आबासाहेबांनी शिक्षण संस्था उभी केली आणि या दिव्य कार्याची सुरुवात ढोरजळगाव येथून झाली. कर्मयोगी आबासाहेब काकडे हे सत्पुरुष म्हणून जन्माला आले आणि त्यांचा जन्म शिक्षणरूपी गंगा ग्रामीण भागापर्यंत पोहचवण्याचे महान कार्य केले. असे प्रतिपादन आदिनाथ महाराज निकम यांनी बोलताना व्यक्त केले. श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय ढोरजळगाव येथे कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचा १०७ वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यावेळी ते बोलत होते.यावेळी विद्यालयातील माजी विद्यार्थी चि.ऋषिकेश उगले यांचा सी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तर अर्जुन फुलमाळी, आकाश शिंदे,सूरज फसले यांची मुंबई पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल व कु.गिरीजा देशमुख व चि.साई आंबूर्डे यांचा शिष्यवृत्ती परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल पालकासमवेत सन्मान करण्यात आला.प्रमुख अतिथी विद्यालयाचे माजी विद्यार्थी गहिनीनाथ बडे म्हणाले या शाळेने केलेले संस्कार आयुष्यभरासाठी उपयोगी ठरले आणि आबासाहेब काकडे यांची शाळेविषयी तळमळ आम्ही अनुभवली आहे त्यातून आम्ही स्वावलंबन शिकलो असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी देविदास पाटेकर, बापूसाहेब पाटेकर, देविदास गिऱ्हे, भिवेसन केदार, अशोक लांडे, विक्रम उकिर्डे, भाऊसाहेब अकोलकर, संभाजी लांडे, संभाजी फसले, पांडुरंग गरड, विजय पाटेकर, ज्ञानेश्वर उगले, प्राचार्य संजय चेमटे, सुरेखा शेलार यांचेसह यशस्वी माजी विद्यार्थी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## उपवर्गीकरणाबाबत आंबेडकरी चळवळीतील भूमिका स्पष्ट करावी : गायकवाड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** भारतीय संविधानाने या देशातील प्रत्येक वर्ग समूह व घटकाला आपले हक्क आणि अधिकार प्राप्त करून दिले असून त्या आधारानेच न्याय ,बंधुत्व व समता प्रस्थापित करण्याचे महान काम महामानव डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी केले असल्याने स्वतंत्र भारताची स्वतंत्र घटना ही सर्वसमावेशक असताना तिच्यातील काही बाबींमध्ये बदल करण्याचा जो प्रयत्न सध्या शासन पातळीवरून सुरू आहे. तो घटनेच्या विरोधात तर आहेच परंतु भविष्यात मागासवर्गीयांच्या जवळपास ५८ जातीच्या विरोधात कलह निर्माण करणारा असल्याने या बाबत राज्यातील आंबेडकरी चळवळीतील सर्वच नेते मौन पाळून असून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे मागासवर्गीय सेलचे राज्याचे उपाध्यक्ष उत्तमराव गायकवाड यांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, भारतीय घटनेच्या संविधानामध्ये आरक्षण विषयावर कलम ३४० नुसार नागरिकाचा मागास प्रवर्ग (ओबीसी) या घटकांना , कलम ३४१ नुसार मागासवर्गीय घटकातील अनुसूचित जातींना (एस सी) व कलम ३४२ नुसार अनुसूचित जमातींना (एस टी) या वर्गसमूहांना आरक्षण दिलेले असून त्या वेळी डॉ बाबासाहेबांनी आंबेडकर यांनी दिलेले आरक्षण आहे. त्यातील कलम ३४१ मध्ये ५९ जातींना समाविष्ट करण्यात आले असून भारतीय संविधाचा ७५ व सुवर्ण महोत्सव साजरा झाल्यानंतर कलम ३४१ मधील ५९ जातींपैकी मांग या जातीमधील वर्ग समूहातील काही तथाकथित राजकीय पुढाऱ्यांनी याच कलम ३४१ मधून आरक्षण घेत असलेल्या महार (बौद्ध) समाजाकडे बोट दाखवत याच समाजाने घटनेतील आरक्षणाचा जास्तीत - जास्त फायदा घेण्याचा प्रयत्न केला असल्याबाबतचा आरोप ठेवत अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गिकरण करून आम्हाला अ ब क ड करून स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे ही मागणी गेली अनेक महिन्यापासून सुरू असून ते झालेच पाहिजे या विषयासाठी मोठा आटापिटा चालू असून व ते होऊच नये म्हणून आंबेडकर चळवळीतील राज्यातील असंख्य नागरिक नेत्याविना आंदोलन करत असताना दिसून येत असून या प्रमुख विषयाकडे राज्यातील सर्वच पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नसल्याने ती भूमिका नेत्यांनी स्पष्ट करावी अशीही माहिती शेवटी गायकवाड यांनी दिली आहे.

# नेप्तीचे मोहरम एकतेचे जिवंत उदाहरण : प्रा. होले

## हिंदू - मुस्लिम सलोखा, वरूणराजासाठी सर्वधर्मीयांची आळवणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथे मोहरमच्या निमित्ताने गावात धार्मिक श्रद्धा, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले. नालसाब, इमामी कासम, मौला अली यांच्यासह ताबूतांचे पारंपरिक पद्धतीने स्थापना करण्यात आली . यावेळी गावातील हिंदू व मुस्लिम समाजातील नागरिक, युवक आणि ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने होती. सर्व धर्मीय बांधवांनी एकत्रित सहभाग घेत एकोपा आणि बंधुभावाचा संदेश दिला. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर मोहरमच्या कार्यक्रमात सर्व धर्मीय बांधवांनी एकत्र येऊन चांगल्या पावसासाठी प्रार्थना केली. सर्वांच्या शेतात भरघोस पीक यावे, जनावरांना चारा-पाणी मिळावे आणि गावात सुख-समृद्धी नांदावी, अशी भावनिक प्रार्थना करण्यात आली. या प्रसंगामुळे धार्मिक कार्यक्रमाला सामाजिक संवेदनशीलतेचीही जोड मिळाली.

हजरत इमाम हुसेन यांच्या बलिदानातून सत्य, न्याय आणि मानवतेसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते. नेप्ती गावात अनेक वर्षांपासून सर्व धर्मीय बांधव परस्पर स्नेह, विश्वास आणि आदराच्या



भावनेतून एकत्र राहत आहेत. मोहरमसारख्या धार्मिक पर्वातून समाजात बंधुभाव आणि सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याचे समाधान वाटते. मोहरमचा संदेश म्हणजे त्याग, मानवता व सर्वधर्मसमभाव आहे.नेप्तीचे मोहरम सामाजिक एकतेचे जिवंत उदाहरण आहेअसे प्रतिपादन प्राध्यापक एकनाथ होले सर यांनी केले.

माजी उपसरपंच फारुक सय्यद यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, नेप्ती गावात इतर सर्व धार्मिक उत्सव परस्पर सहकार्याने साजरे करण्याची गौरवशाली परंपरा आहे. गावातील हिंदू-मुस्लिम युवकांनी एकत्र येऊन मोहरमचे आयोजन केल्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक बळकट झाले आहे. आजच्या कार्यक्रमातून बंधुता, शांतता आणि एकोप्याचा संदेश संपूर्ण समाजापर्यंत पोहोचला आहे. गावातील युवकांनी दाखविलेली एकजूट हीच नेप्तीची खरी ओळख असून भविष्यातही ही परंपरा अधिक बळकट होईल.

नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने माजी उपसरपंच फारुक सय्यद व प्राध्यापक एकनाथ होले सर यांच्या हस्ते सवारीला चादर अर्पण करून पावसासाठी सामूहिक साकडे घालून प्रार्थना करून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी फारुक सय्यद, वसंत पवार, रामदास फुले, दादू चौगुले, मुनीर सय्यद, प्रा. एकनाथ होले, सलीम सय्यद, हुसेन सय्यद, परवेज सय्यद, भूषण पवार, लौकिक चौगुले, सादिक पवार, संजय राऊत, प्रभाकर चहाळ, संतोष चहाळ, रमेज सय्यद, वसीम सय्यद, साहिल सय्यद, बाबूलाल सय्यद, जावेद सय्यद, जमीर सय्यद, गुलाब सय्यद, उमर सय्यद, युनूस सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, मुख्तार सय्यद, कय्युम सय्यद, बादशाह सय्यद, वाजिद सय्यद, अन्सार सय्यद, बबन सय्यद, रफिक सय्यद, आसिफ शेख, इमरान सय्यद ,नसीर सय्यद ,नितीन पवार हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

द•ख•ल

## हरणी येथे बेकायदा विदेशी दारू विक्रीवर पोलिसांची कारवाई

**नाझरे सुपे :** सासवड पोलीस ठाण्याच्या पथकाने हरणी गावात बेकायदा विदेशी दारू विक्री करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करून मद्यसाठा जप्त केला. या प्रकरणी शंकर रघुनाथ यादव (वय ४७, रा. हरणी, ता. पुरंदर, जि. पुणे) याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५ (ई) अन्वये सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. दि. २४ जून २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजण्याच्या सुमारास हरणी–वाल्हे रस्त्यालगत उजव्या बाजूस असलेल्या एका किराणा दुकानाशेजारील शेडमध्ये शंकर यादव हा कोणताही वैध परवाना नसताना विदेशी दारूचा साठा बाळगून ओळखीच्या व्यक्तींना विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सासवड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संदीप वसंत पवार (बकल क्रमांक १९१५) यांनी कारवाई करत छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यातून रॉयल चॅलेंज कंपनीच्या १८० मिली क्षमतेच्या दोन बाटल्या, मॅकडॉवेल नं. १ कंपनीची १८० मिली क्षमतेची एक बाटली आणि रॉयल स्टॅग कंपनीची १८० मिली क्षमतेची एक बाटली असा एकूण ९६० रुपयांचा विदेशी मद्यसाठा जप्त करण्यात आला. संबंधित मद्यसाठा बेकायदेशीररीत्या विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणी पोलीस हवालदार संदीप वसंत पवार यांनी फिर्याद दिली असून दाखल अंमलदार म्हणून पोलीस हवालदार लाटणे (बकल क्रमांक २४६४) यांनी कामकाज पाहिले. पुढील तपास पोलीस हवालदार संदीप पवार करीत असून ही कारवाई सासवड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बेकायदा दारू विक्रीविरोधात पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून परिसरात खळबळ उडाली आहे.

## चांबळी येथे बेकायदा देशी दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई

**नाझरे सुपे :** सासवड पोलीस स्टेशनच्या पथकाने चांबळी गावाच्या हद्दीत बेकायदा देशी दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर कारवाई करून देशी दारूचा साठा जप्त केला. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल निलेश तुकाराम पवार (बकल नं. १२६३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक २८८/२०२६ दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.५० वाजण्याच्या सुमारास मौजे चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील सासवड–बोपदेव मार्गालगत असलेल्या आत्मशांती हॉटेलच्या आडोशाला आरोपी कपील सुदाम कामठे (वय ३१, रा. चांबळी, ता. पुरंदर, जि. पुणे) हा आपल्या ताब्यात देशी दारूचा साठा विनापरवाना बाळगून विक्री करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून टँगो पंच कंपनीच्या देशी दारूच्या ९० मिली मापाच्या ३९ बाटल्या जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ हजार ५६० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणात गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार लाटणे (बकल नं. २४६४) यांनी केली असून तपास पोलीस हवालदार होळकर (बकल नं. १९३६) करीत आहेत. ही कारवाई सासवड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बेकायदा दारू विक्रीविरोधात सासवड पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## भोरला आज कृतज्ञता सन्मान सोहळा

**भोर :** भोरचे माजी नगराध्यक्ष दिवंगत अमृतशेठ रावळ यांच्या १२ व्या स्मृतीदिनाचे औचित्याने यावर्षी विविध क्षेत्रातील कार्यकर्तृत्ववान व्यक्तींना स्व.अमृतदादा रावळ स्मृती कृतज्ञता गौरव सन्मान देऊन सन्मानित करण्यात येणार असल्याचे शर:प्रभा प्रतिष्ठानचे पार्थ रावळ यांनी सांगितले.यावेळी, कैलासबेन रावळ,माजी नगराध्यक्ष विठ्ठल शिंदे,विजय रावळ, राजश्री रावळ,उपस्थित होते.शहरातील गं. प. वाचनालयाचे सभागृहात( दि. २६)कार्यक्रम संपन्न होणार असून विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानीत करण्यात येणार आहे.यामध्ये जगदीश किरवे (राजकीय ), राजीव केळकर (सामाजिक ),डॉ.रोहिदास जाधव(साहित्य ),प्रा.प्रकाश मोरे (कला आणि संस्कृती ), सुभाष फेरवाणी (व्यापार आणि उदयोग ), डॉ. इम्रान खान (वैद्यकीय ),विठ्ठल दानवले (शैक्षणिक ),विजय जाधव (पत्रकारिता ),सौरभ खुटवड (कृषी ),कावेरी शिंदे(महिला सक्षमीकरण)यांचा समावेश आहे.

## शिंदच्या गुरुकुलधामला जिल्हा बँकेची आर्थिक मदत

**भोर :** माऊली विद्यार्थी सेवा ट्रस्ट शिंद ता.भोर संचलित गुरुकुलधाम संस्थेस पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सीएसआर फंडातून ५० हजारांची संगणक संच खरेदीसाठी आर्थिक मदत करण्यात आली. मदतीचा धनादेश बँकेचे तज्ञ संचालक भालचंद्र जगताप यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन सोमनाथ सोमानी,राजगडचे विश्वस्त पंढरीनाथ भिलारे,माजी सरपंच धोंडीबा खुटवड,रवींद्र बांदल,संस्थेचे संस्थापक उमेश महाराज शिंदे,हरिदास खाटपे,दादा भालेघरे, सर्जेराव शिंदे उपस्थित होते.जगताप बोलताना म्हणाले शिंद येथील गुरुकुलधाम संस्था तालुक्यात आदर्शवत असून सांप्रदायिक क्षेत्रातील विद्यार्थी घडवण्यासाठी संस्थेचा मोलाचा वाटा आहे.संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत बहुतांशी सांप्रदायिक विद्यार्थी घडून गेले आहेत.पुढील काळात भविष्यातील कीर्तनकार,प्रवचनकार तसेच समाज प्रबोधन करणारे अनेक सुशिक्षित नागरिक घडतील. त्याचा उपयोग तालुक्यात सांप्रदाय वाटवण्यासाठी होणार असून संस्थेला भविष्यकाळात सर्वतोपरी मदत करणार आहे.

# करडे-कारेगाव रस्त्यावरील विजेचे खांब बनले जाहिरातींचे केंद्र; प्रशासनाचे दुर्लक्ष ?

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**रांजणगाव गणपती:-** करडे–कारेगाव रस्त्याच्या कडेला उभे असलेले महावितरणचे विजेचे खांब सध्या वीजपुरवठ्यापेक्षा अधिक प्रमाणात जाहिरातबाजीसाठी वापरले जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. रस्त्यालगतच्या अनेक खांबांवर उउढत कॅमेरे, प्लॉटिंग प्रकल्प, जमीन खरेदी–विक्री तसेच विविध व्यावसायिक जाहिरातींचे फलक मोठ्या प्रमाणावर लावण्यात आले आहेत. यामुळे सार्वजनिक मालमत्तेचा सर्रास गैरवापर होत असून संबंधित विभाग मात्र याकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.




करडे–कारेगाव मार्ग हा परिसरातील महत्त्वाचा आणि वर्दळीचा रस्ता मानला जातो. रांजणगाव औद्योगिक वसाहतीत जाणारा हा प्रमुख मार्ग आहे. मात्र या मार्गावरील अनेक विजेच्या खांबांवर अनधिकृत उउढत आणि जाहिरातींचे होल्डिंग लावलेले आहेत. काही ठिकाणी तर एका खांबावर तीन ते चार जाहिराती लावण्यात आल्याने खांबांचे मूळ स्वरुपच हरवले आहे. विशेष म्हणजे या जाहिरातींमध्ये ''अधिकृत प्लॉटिंग'', ''छअ प्लॉट्स'' अशा आकर्षक मजकुराचा वापर करुन ग्राहकांना भुरळ घालण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते.

स्थानिक नागरिकांच्या मते, सार्वजनिक मालमत्तेचा वापर करुन व्यावसायिक प्रसिद्धी मिळविणे हा नियमांचा भंग आहे. संबंधित जाहिरातदारांना कोणाची परवानगी आहे...? महावितरणकडून किंवा ग्रामपंचायतीकडून यासाठी मंजुरी देण्यात आली आहे का...? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. अनेकदा जाहिराती लावण्यासाठी खांबांवर लोखंडी तारा बांधल्या जातात त्यामुळे विजेचा धक्का बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सध्या पाऊस सुरु झाल्यामुळे हि शक्यता जास्तच वाढली आहे.

याशिवाय रस्त्यावर गाडी चालविणाऱ्या वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका वाढत असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. एका बाजूला प्रशासन स्वच्छता, सौंदर्यीकरण आणि बेकायदेशीर फलक हटविण्याच्या मोहिमा राबवत असताना दुसऱ्या बाजूला सार्वजनिक विजेचे खांब प्लॉटिंग करणाऱ्या जाहिरातदारांच्या ताब्यात गेल्याचे चित्र दिसत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. त्यामुळे महावितरण, ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाने तातडीने संयुक्त कारवाई करुन अशा अनधिकृत जाहिराती हटवाव्यात, तसेच संबंधित जाहिरातदारांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.

सार्वजनिक मालमत्ता की जाहिरातींचे होर्डिंग...? कारेगाव–करडे रस्त्यावरील विजेचे खांब सध्या वीजपुरवठ्यापेक्षा जाहिरातबाजीसाठी अधिक उपयोगात येत असल्याचे चित्र आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास उद्या प्रत्येक खांब खासगी जाहिरातींच्या विळख्यात अडकलेला दिसेल, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे जाहिरातदारांना मोकळे रान न देता त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.

महावितरणच्या विजेच्या खांबाला जर कोणी जाहिरातीचे अनधिकृत बॅनर लावत असतील तर ते बेकायदेशीर आहे. अशा जाहिरात करणाऱ्या आणि त्या जाहिराती लावणाऱ्या दोन्हीही व्यक्तींवर आम्ही कायदेशीर कारवाई करणार आहोत.

# कारेगावच्या यश इन चौकात कचऱ्याचे साम्राज्य

## ग्रामपंचायत प्रशासनाचा बेजबाबदार कारभार चव्हाट्यावर

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**रांजणगाव गणपती:-** कारेगावच्या प्रवेशद्वारासारखी ओळख असलेल्या यश इन चौकात गेल्या अनेक दिवसांपासुन कचऱ्याचा प्रचंड ढिग साचलेला असून ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रिय आणि बेजबाबदार कारभारामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. गावाच्या मुख्य चौकातच कचऱ्याचे ढिगारे साचलेले असताना स्वच्छतेच्या गप्पा मारणारे ग्रामपंचायत प्रशासन नेमके कोणत्या कामात व्यस्त आहे, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. कचऱ्याच्या ढिगातून येणाऱ्या तीव्र दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक, व्यावसायिकांचे जगणे मुश्किल झाले आहे. डास, माश्या आणि भटक्या जनावरांनी या ठिकाणी अक्षरशः मुक्काम ठोकला असून भविष्यात डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या आजारांचा उद्रेक झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, स्वच्छता, आरोग्य आणि ग्रामविकासाच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च केल्याचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात गावाच्या मध्यवर्ती चौकात कचऱ्याचे साम्राज्य उभे राहत असेल, तर हा निधी नेमका कुठे आणि कोणासाठी खर्च केला जातो, याची चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेकवेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी करण्यात आल्या. मात्र कचरा उचलण्यासाठी किंवा परिसर स्वच्छ करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीची कार्यपद्धतीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. स्वच्छ भारत अभियान फक्त फलकांपुरतेच...? एकीकडे शासन स्वच्छ भारत अभियानासाठी कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, तर दुसरीकडे कारेगावच्या मुख्य चौकात कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसत आहेत. त्यामुळे स्वच्छतेचे अभियान हे फक्त फलक, बॅनर आणि कागदोपत्री अहवालांपुरतेच मर्यादित राहिले आहे का, असा सवाल नागरिक विचारत आहेत. एखाद्या दुर्घटनेची वाट पाहताय का...? कचऱ्यामुळे दुर्गंधी, आरोग्याचा प्रश्न आणि वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असताना प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. एखादी मोठी रोगराई पसरल्यानंतर किंवा गंभीर घटना घडल्यानंतरच ग्रामपंचायत जागी होणार का...? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तर आंदोलन करु; नागरिकांचा इशारा... यश इन चौकातील कचरा तात्काळ हटवून नियमित स्वच्छता व्यवस्था सुरु करावी, अन्यथा ग्रामस्थांना लोकशाही मार्गाने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. ''कारेगाव हे स्वच्छतेच्या घोषणांनी नव्हे, तर यश इन चौकातील कचऱ्याच्या ढिगाने ओळखले जाऊ लागले आहे

# अडीच किलो गर्भाशयातील गाठीचे यशस्वी ऑपरेशन; महिलेला दिलासा

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** गेल्या चार वर्षांपासून पोटात गोळा असल्याची तसेच मासिक पाळीदरम्यान त्रास होत असल्याची तक्रार असलेल्या एका महिलेवर शिरूर येथील डॉ. पानगे हॉस्पिटल व प्रसूतीगृहात यशस्वी शस्त्रक्रिया करून तब्बल अडीच किलो वजनाची गर्भाशयातील (गर्भपिशवीतील) गाठ काढण्यात डॉक्टरांना यश आले आहे.

सदर महिलेला अनेक वर्षे त्रास होत असतानाही प्रत्येक वेळी तात्पुरता उपचार करण्यात आला. स्थानिक डॉक्टरांनी सुचविलेल्या सोनोग्राफी व रक्त तपासण्या वेळेत झाल्या नव्हत्या. दोन महिन्यांपूर्वी रुग्ण डॉ. पानगे हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर सर्वप्रथम सोनोग्राफी करण्यात आली. त्यामध्ये गर्भाशयात सुमारे ५ ते १० सें.मी. आकाराच्या ५ ते ६ गाठी असल्याचे निदान झाले. गाठींच्या वाढलेल्या आकारामुळे रुग्णाचे पोट साधारण सात महिन्यांच्या गरोदर महिलेसारखे दिसत होते. पुढील रक्त तपासणीत रुग्णाच्या शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण केवळ ६.६ ग्रॅम इतके कमी असल्याचे समोर आले. मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या अतिरिक्त रक्तस्रावामुळे तीव्र रक्तक्षय निर्माण झाला होता. डॉक्टरांनी तत्काळ शस्त्रक्रिया न करता प्रथम रक्तवाढीसाठी उपचार व इंजेक्शन देऊन रुग्णाची प्रकृती सुधारली. सुमारे दोन महिन्यांच्या उपचारानंतर शस्त्रक्रिया करण्यात आली.

सोनोग्राफी दरम्यान आढळून आले की, अडीच किलो वजनाच्या गाठीमुळे दोन्ही किडन्यांच्या मूत्रवाहिन्यांवर (युरेटर) दाब निर्माण होऊन दोन्ही किडन्यांना सूज (Hydonephosis) आली होती. वेळेत शस्त्रक्रिया झाली नसती तर किडन्यांचे कार्य हळूहळू कमी होण्याचा तसेच रक्तक्षयामुळे इतर अवयवांवरही परिणाम होण्याचा धोका होता.

मोठ्या आकाराच्या गाठीमुळे रुग्णाला पचनाचा त्रास, दम लागणे, सतत थकवा येणे आणि चक्कर येणे अशी लक्षणेही जाणवत होती. ही यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. स्वाती पानगे, डॉ. साहेबराव पानगे, डॉ.रवींद्र टेमगिरे तसेच भुलतज्ञ डॉ. रवींद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शस्त्रक्रियेनंतर रुग्ण आणि तिच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त करत डॉक्टरांचे आभार मानले.

# यादववाडीत अवैध देशी दारू विक्रीवर सासवड पोलिसांची कारवाई जयवंत यादवविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील यादववाडी येथे अवैधरीत्या देशी दारूची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर सासवड पोलिसांनी छापा टाकून ८ हजार रुपये किमतीचा देशी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी जयवंत गुलाब यादव (वय ५३, रा. यादववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे) याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रोहिबिशन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २४ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता यादववाडी गावच्या हद्दीत हॉटेल लोटसच्या पाठीमागे असलेल्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला जयवंत यादव हा परवानगीशिवाय देशी दारूचा साठा बाळगून त्याची विक्री करत असल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान पोलिसांनी 'टॅगो पंच' या नावाची ९० मिली क्षमतेच्या बाटल्यांमध्ये भरलेली देशी दारू जप्त केली. प्रत्येकी १०० बाटल्यांचे दोन बॉक्स, अशा एकूण २०० बाटल्यांचा साठा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत ८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कॉन्स्टेबल किरण हनुमंत तुपे (बकल क्रमांक १३६७) यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली. त्यानुसार सासवड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक २८७/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्रोहिबिशन कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची नोंद दुपारी १.५७ वाजता करण्यात आली.

या गुन्ह्याचे दाखल अमलदार पोलीस हवालदार लाटणे (बकल क्र. २४६४) असून पुढील तपास पोलीस हवालदार पवार (बकल क्र. १९१५) करीत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक पोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# मॉडेल स्कुल शिंगवे शाळेचे सामाजिक अंकेक्षण पूर्ण..

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव :** केंद्र शासनाच्या समग्रशिक्षा अभियानांतर्गत शाळांना मिळणाऱ्या विविध अनुदानाचा विनियोग आणि उपलब्ध भौतिक सुविधांचा आढावा घेण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या सामाजिक अंकेक्षणाच्या (सोशल ऑडिट) पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची दोनदिवसीय तपासणी नुकतीच पूर्ण झाली.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगवे येथे सामाजिक अंकेक्षण पथकाचे स्वागत करताना मुख्याध्यापक व शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती..

शिक्षण विभागामार्फत नियुक्त पथकातील विशाखा दाभाडे वर्धा आणि अस्मिता दादमल चंद्रपूर यांनी दोन दिवस शाळेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी शाळेला प्राप्त झालेल्या निधीचा वापर नियोजित आणि पारदर्शक पद्धतीने झाला आहे का, यासंदर्भातील कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान वर्गखोल्यांची तसेच भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली.

वद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच 'निपुण महाराष्ट्र' आणि 'विद्यार्थी सुरक्षा' यांसारख्या उपक्रमांच्या अंमलबजावणीचाही आढावा घेण्यात आला.

मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर यांनी शाळेतील उपलब्ध सुविधांची माहिती पथकास दिली. त्यानंतर पथकाने छायाचित्रे घेऊन संबंधित माहिती संग्रहीत व अपलोड केली. अंकेक्षण पूर्ण झाल्यानंतर पथकाने शालेय व्यवस्थापन समिती सदस्यांसमोर अहवालाचे वाचन केले. या वेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समीर गोरडे, उपाध्यक्ष रेखा पाबळे, मुख्याध्यापक नवनाथ सिनलकर, जालिंदर पोंदे, श्रीकृष्ण डुकरे, विलास भोर, अशोक लोखंडे, सुभाष इंदोरे, वैजयंती लोखंडे, संगीता इंदोरे,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते..

# जलव्यवस्थापन कामातून केला १२ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** ग्रामीण भागातील लोकसहभाग, विविध कंपन्यांचा सीएसआर फंड याद्वरे जलसंधारण, ग्रामीण विकास व जल व्यवस्थापन कार्यक्रम राबवत पुरंदर तालुक्यातील खळद येथील ग्रामगौरव प्रतिष्ठान अर्थात पाणीपंचायत शेतकऱ्यांना व ग्रामीण अर्थव्यवस्थेला गेली पाच दशके बळकटी देण्याचे काम करत आहे. या वर्षी संस्थेने ५१ वर्षे पूर्ण केली असून पुरंदरसह सातारा आणि रत्नागिरी जिल्ह्यातील काही गावातून जलसंधारणाच्या कामातून तब्बल १२ कोटी लिटर अतिरिक्त पाणीसाठा रनिर्माण करत अभिनंदनीय काम केले आहे.



संस्थेने या वर्षी पुरंदर तालुक्यातील दौंडज, सुकलवाडी कांबळवाडी, काळदरी, खळद, वाल्हे, पांगारे, बहिरवाडी, कोलाडवाडी यांसह सातारा जिल्ह्यातील धनगरवाडी, मिरढे तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली यां गावातून पाझर तलावांचे पुनःरुजीवन, माती नाले व सिमेंट नाले यातील गाळ काढणे, काही ठिकाणी पाट दुरुस्ती व अन्य जल संधारणाची कामे करून त्या परिसरातील शेतकऱ्यांना ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम केले आहे. संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त डॉ सोनाली शिंदे यांनी या निमित्ताने पाणी आडवा पाणी जिरवा हा केवळ संदेश न करता ग्रामीण विकासाचा तो पाया आहे हे गृहीत धरून संस्था गेली पन्नास वर्षे लोक सहभाग व कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व याच्या बळावर ग्राम विकास साधत असल्याचे म्हटले आहे

संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमासाठी प्रशांत बोरावके, योगेश मगर,ऋषीं बळीद, प्रशांत कुंभारकर, सागर भोंडे भाग्यश्री कुंभारकर, सोनाली जगताप या संस्थेच्याच मंडळींचे विशेष योगदान लाभले आहे.

# मोबाईलच्या दुनियेत विद्यार्थ्यांचा अभ्यास हरवला; पालकांकडून चिंता व्यक्त

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या हातात आलेला मोबाईल आता त्यांच्या अभ्यासावरच विपरीत परिणाम करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शाळा आणि महाविद्यालये नियमित सुरू झाल्यानंतरही अनेक शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना विविध व्हॉट्सअॅप गटांवर गृहपाठ, नोट्स व अभ्यासक्रम पाठवला जात असल्याने विद्यार्थ्यांच्या हातातील मोबाईलचा वापर वाढला आहे.



अनेक विद्यार्थी ''शिक्षकांनी अभ्यास पाठवला आहे'' असे कारण सांगून तासन्तास मोबाईलमध्ये गुंतून राहत असल्याची तक्रार पालकांकडून केली जात आहे. अभ्यासाच्या नावाखाली सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, व्हिडिओ आणि इतर मनोरंजनात्मक अॅप्सचा वापर वाढत असल्याने विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे.

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, लहान वयातच मोबाईलचे व्यसन लागल्यास विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक विकासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. एकाग्रता कमी होणे, डोळ्यांचे विकार, झोपेच्या समस्या तसेच सामाजिक संवादात घट होणे यासारख्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे शिक्षकांनी अत्यावश्यक असल्याशिवाय मोबाईलद्वरे गृहपाठ पाठविणे टाळावे, तसेच पालकांनीही विद्यार्थ्यांना केवळ आवश्यक कामापुरताच मोबाईल उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पालकवर्गातून होत आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी शिक्षक, पालक आणि समाजाने एकत्रितपणे मोबाईलच्या अतिवापरावर नियंत्रण आणणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे

# जेजुरी परिसरातील ब्लॅक स्पॉटची संयुक्त पाहणी अपघात रोखण्यासाठी तातडीच्या उपाययोजना

**प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** महाराष्ट्र शासनाने रस्ते अपघातांमध्ये १५ टक्के घट करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून त्याअनुषंगाने मंगळवारी जेजुरी पोलीस स्टेशन हद्दीतील अपघातप्रवण (ब्लॅक स्पॉट) ठिकाणांची संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीत पोलीस, महामार्ग पोलीस, परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग (झथृ), राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छकअख) तसेच स्थानिक पत्रकार सहभागी झाले होते.



उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर आणि पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ११ ते दुपारी २.३० या वेळेत जेजुरी–मोरगाव, जेजुरी–निरा आणि जेजुरी–सासवड मार्गावरील नऊ अपघातप्रवण ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

या पाहणीदरम्यान रस्त्यांची रचना, वाहतुकीची परिस्थिती, दिशादर्शक फलक, वेगमर्यादा नियंत्रण, प्रकाश व्यवस्था तसेच अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या विविध बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी अपघात प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करून विविध सूचना मांडल्या.

यामध्ये परावर्तित दिशादर्शक व सूचना फलक बसविणे, स्पीड लिमिट बोर्ड उभारणे, रंबल स्ट्रिप्स टाकणे, रोड मार्किंग करणे, झेब्रा क्रॉसिंग स्पष्ट करणे, डिव्हायडरवर कॅट आय बसविणे, प्रकाश व्यवस्था सुधारणे तसेच वाहनचालकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे आदी उपायांचा समावेश आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, मावडी बसस्टॉप, एमआयडी कार्यालय परिसर, दौडंज खिंड, भैरवनाथ मंदिर परिसर, आयसीयू हॉस्पिटल आणि श्री विठ्ठल ढाबा परिसरात यापूर्वी करण्यात आलेल्या कायमस्वरूपी उपाययोजनांमुळे तेथील अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. मात्र, जेजुरी–मोरगाव मार्गावरील काळा ओढा–नाझरे कप फाटा हा परिसर अद्याप गंभीर अपघातप्रवण ठरत असून येथे वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना तातडीने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित विभागांनी आवश्यक कामे लवकर पूर्ण करून प्राणघातक व गंभीर अपघात टाळण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे आश्वासन दिले. जेजुरी परिसरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर ही संयुक्त पाहणी महत्त्वपूर्ण मानली जात असून रस्ते सुरक्षा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे

द•ख•ल

## शालेय साहित्यांची भेट आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य



**लिंपणगाव :** अग्नीपंख फौडेशनने ज्या विद्यालयात मुलांपेक्षा मुलींची संख्या जादा अशा ढवळगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील उपेक्षित कुंटुबांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याची भेट दिले त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य पाहावयास मिळले. बुधवारी ढवळगाव येथे झालेल्या कार्यक्रमात उद्योजक गणेश साळुंके विकास आढाव अनिरुद्ध लाकुडझोडे यांचे हस्ते हे साहित्य वाटप करण्यात आले. अंकुश कऱ्हे व प्रतिक्षा रोटकर यांची पोलीस कॉस्टेबल पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार केला. गणेश साळुंके म्हणाले की समाज कार्याची शिकवण वडीलांकडूनच मिळाली यात मी समाधानी आहे. मोहन आढाव म्हणाले की शाळा विद्यालये समाज परिवर्तनाची खरी माध्यमे आहेत यांना मदत करणे हेच अग्नीपंख फौडेशनचे ध्येय आहे. लवकरच शिक्षक मोटिव्हेशन कॅप व विद्यार्थी व खेळाडूंचा महोत्सव आयोजीत करण्याचा मानस आहे. यावेळी अग्नीपंखचे उपाध्यक्ष प्रा संजय लाकुडझोडे बाळासाहेब पवार यांची भाषणे झाली. प्रास्ताविक प्राचार्य मधुकर सुपेकर यांनी केले. यावेळी सचीन कातोरे, रमेश साळुंके, किसन वऱ्हाडे, जयश्री डोंगरे, बाळासाहेब शिंदे, तुकाराम बोरगे, गौतम वांळुज, माणिक ढवळे उपस्थित होते. सुत्रसंचलन सुरेश शिंदे तर आभार सुनील डोंगरे यांनी मानले.

## श्रीगोंदयात महिलांच्या हाती सहकाराची धुरा सरला ढुस चेअरमन, अश्विनी पवार व्हाईस चेअरमन



**श्रीगोंदा :** येळपणे (ता. श्रीगोंदा) येथील येळपणे-पिसोरे बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी सरला गणेश ढुस तर व्हाईस चेअरमनपदी अश्विनी अजित पवार यांची बिनविरोध निवड झाल्याने संस्थेच्या नेतृत्वाची धुरा आता महिलांच्या हाती आली आहे. या निवडीमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून संस्थेच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संस्थेचे तत्कालीन चेअरमन नवनाथ सोपान देवकर आणि व्हाईस चेअरमन संजय धावडे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने दोन्ही पदे रिक्त झाली होती. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भाऊसाहेब बी. शिनारे यांनी काम पाहिले. त्यांना संस्थेचे सचिव जमीर हावलदार यांनी सहकार्य केले. निवड जाहीर होताच उपस्थित संचालक, सभासद आणि ग्रामस्थांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला. यावेळी पोपट ढुस, नवनाथ देवकर, भानुदास जगदाळे, ज्ञानेश्वर चौधरी, दादाराजे गिरमकर, बाळासाहेब पवार, आनंदराव खामकर, सतीश हुलसर, कारभारी कोळपे, संजय धावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## आनंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मोफत बुटाचे वाटप



**शिराळ चिचोंडी :** ग्रामीण भागातील कष्टकरी शेतकरांच्या मुलांनाही प्रगतीची उंच शिखरे सर करावीत याउदार हेतूने टाटा मेमोरियल फौंडेशन व विठ्ठल गायकवाड यांच्या वतीने एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले. आनंद विद्यालया मधील तब्बल ३८४ विद्यार्थ्यांना दिल्लीहून मागवण्यात आलेल्या ८६ हजार रुपये किमतीच्या दर्जे दार बुटाचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमालावर्धमान प्रमोद गुगळे, संभाजी पालवे, अंबादास डमाळेगीते, जनार्दन गीते, भानुदासराव आव्हाड, पद्माकर आव्हाड, घनश्याम आव्हाड, कमलेश गुगळे, आनंद गुगळे, शिवाजी दानवे, नवनाथ पालवे, नागेश आव्हाड, बबनराव गायकवाड, चंद्रकांत तुपे, विलास आव्हाड, बाबासाहेब आव्हाड, मेजर रोहिदास आव्हाड, संजय तुपे, नवनाथ पालवे, सुधाकर आव्हाड, रोहिदास आव्हाड तसेच विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व चिचोंडी पंचकोशीतील पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत बस पासचे वितरण



**कर्जत :** महाराष्ट्र शासनाच्यावतीने विद्यार्थिनींसाठी राबविण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत बस पासचे वितरण गुरुवारी कर्जतच्या सोनाबाई सोनमाळी कन्या विद्यामंदिरात वाहतूक नियंत्रक किरण भांगे व नवनाथ राऊत यांच्या हस्ते विद्यार्थिनींना करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका महेजबिन पठाण उपस्थित होत्या. यावेळी बोलताना एसटी प्रशासनाचे नवनाथ राऊत म्हणाले की, एसटीचा प्रवास हा सुखकर प्रवास असून एसटी महामंडळ प्रत्येक प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घेते. प्रवासा दरम्यान खिडकीतून बाहेर न झुकणे, तसेच प्रवासात काही अडचण आल्यास तात्काळ चालक किंवा वाहक सूचित करावे याबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी मुख्याध्यापिका पठाण यांनी शाळा प्रशासनाकडून एसटी विभागाच्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करीत विद्यार्थिनींसाठी एसटी विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मोफत बस पास उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थिनींनी देखील सुरक्षित व नियमित प्रवासासाठी एसटीचाच वापर करावा असे आवाहन केले.

## न्यायासाठी तहसीलसमोर आमरण उपोषण सुरूच

**श्रीगोंदा :** न्यायाच्या मागणीसाठी श्रीगोंदा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेले आमरण उपोषण चौथ्या दिवशीही सुरूच असून, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आली नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. न्याय मिळेपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, शेतीविषयक वादासंदर्भात दिवाणी न्यायालयाचा आदेश असतानाही संबंधित प्रकरणाची योग्य अंमलबजावणी होत नसून, दिलेल्या तक्रारीची सखोल चौकशीदेखील करण्यात आलेली नाही. त्यामुळे न्याय मिळविण्यासाठी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी सांगितले. दौलत किसन पिंपळे, कुसुम दौलत पिंपळे, सोहम दौलत पिंपळे आणि अजय दौलत पिंपळे हे कुटुंबीय गेल्या चार दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत.

### बंद पडण्याच्या उंबरठ्यावरची

# रुपलाचा तांडा जि.प. शाळा पुन्हा बहरली!

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** दुर्गम डोंगराळ भागातील बंद पडण्याच्या मार्गावर असलेली रुपलाचातांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आज नव्या उमेदीने बहरली आहे. अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत शाळेची पटसंख्या २ वरून १४ विद्यार्थ्यांपर्यंत वाढली असून, शिक्षक, ग्रामस्थ, पालक आणि प्रशासन यांच्या सामूहिक प्रयत्नातून ग्रामीण शिक्षण क्षेत्रात प्रेरणादायी परिवर्तन घडले आहे.

रुपलातांडा येथील जिल्हा परिषद शाळेवर सहा महिन्यांपूर्वी शिक्षक दांपत्य जयराम सातपुते व सौ. दिपा सातपुते यांची प्रशासकीय बदली झाली. यापूर्वी करंजीजवळील भटेवाडी येथील शाळेत त्यांनी एका वर्षात पटसंख्या ४ वरून ४० पर्यंत वाढवून उल्लेखनीय कामगिरी केली होती. त्यामुळे रुपलातांड्यातही शिक्षणाचा नवा अध्याय लिहिण्याचा त्यांनी निर्धार केला.

गावातील अनेक कुटुंबांनी रोजगार व मुलांच्या शिक्षणासाठी स्थलांतर केल्यामुळे शाळेत केवळ दोन विद्यार्थी उरले होते. शाळा ओस पडली होती आणि तिचे अस्तित्व धोक्यात आले होते. मात्र या परिस्थितीसमोर हार न मानता सातपुते दांपत्याने गावकऱ्यांच्या सहकार्याने विविध शैक्षणिक उपक्रम सुरू केले.

पालकांच्या घरभेटी घेऊन त्यांना शाळेतील बदलांचे स्वप्न दाखविण्यात आले. विद्यार्थ्यांसह अंगणवाडीतील मुलांवर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले. परिणामी अल्पावधीतच मुलांमध्ये लक्षणीय शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाचे बदल दिसून आले. या सकारात्मक परिवर्तनामुळे ग्रामस्थांचा शाळेवरील विश्वास दृढ झाला.

विशेष म्हणजे, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षणासाठी स्थलांतर केलेल्या काही पालकांनीही पुन्हा आपल्या मुलांना रुपलातांडा शाळेत दाखल करण्यास सुरुवात केली आहे. शाळेतील दर्जेदार शिक्षणामुळे ग्रामीण भागातही गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू शकते, याची खात्री पालकांना पटू लागली आहे.

भिल्ल समाजातील मुलांनाही शिक्षणाच्या प्रवाहात आणले रुपलातांड्यालगत तीन ते चार किलोमीटर अंतरावरील दुर्गम भागात भिल्ल समाजाची वस्ती आहे. येथील मुले पालकांसोबत भटकंती करत असल्याने शिक्षणापासून वंचित राहत होती. सातपुते दांपत्याने या वस्तीवर जाऊन पालकांशी संवाद साधला व शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.

ही अडचण लक्षात घेऊन जयराम सातपुते व दिपा सातपुते यांनी स्वतःच्या वाहनातून विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याची व परत सोडण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या या संवेदनशील निर्णयामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली.

या यशामध्ये गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड, केंद्रप्रमुख बाळासाहेब पोळ, माजी सरपंच विजय राठोड, उपसरपंच किशोर राठोड, ग्रामसेवक गोपिचंद रोंधे, विशाल राठोड, नितीन जाधव तसेच ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी नागरिक व प्रशासन यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.



**दोन महिन्यांत मुलामध्ये मोठा बदल**

भविष्यातील स्पर्धा लक्षात घेऊन आम्ही मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याचा निर्णय घेतला होता. मात्र रुपलातांडा जिल्हा परिषद शाळेत दर्जेदार शिक्षण दिले जात असल्याचे समजल्यानंतर आम्ही निर्णय बदलला. दोन महिन्यांत मुलामध्ये झालेली शैक्षणिक प्रगती शब्दांत सांगता येणार नाही.

**अभिमन्यु चितळे,**
**पालक, धनगरवाडी**

**अशक्य काहीच नाही हे सिद्ध**

रुपलातांडा जिल्हा परिषद शाळेला नुकतीच भेट दिली. बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या या शाळेत आज १४ विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेत आहेत, हे पाहून आनंद झाला. शिक्षकांच्या प्रयत्नांना ग्रामस्थांच्या सहकार्याची जोड मिळाली तर अशक्य काहीच नाही, हेच या शाळेने दाखवून दिले आहे. शाळेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा.

**शिवाजी कराड,**
**गटशिक्षणाधिकारी, पाथर्डी**

## मेजर वराळ यांनी जपला सेवाभाव : बारहाते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**निघोज :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रेरणेतून मेजर विकास वराळ यांनी सैन्यदलात काम करताना देशाची सेवा केली तोच सेवाभाव त्यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर वेताळबाबा स्टेडियम निर्मिती करुण जपला आजही ते पोलीस विभागात काम करताना तोच सेवाभाव जपत सामाजिक कामांना प्राधान्य देत असल्याचे प्रतिपादन शिरुर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय बारहाते यांनी व्यक्त केले आहे.

मेजर विकास वराळ यांच्या वाढदिवसानिमित्त वेताळबाबा स्टेडियम परिसरात गुरुवार दि.२५ रोजी मेजर वराळ मित्रमंडळ, आजी माजी सैनिक संघटना व निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. चिंच,वड पिंपळ आदी रोपांचे वृक्षारोपण करीत वृक्षसंवर्धन करण्याची जबाबदारी मेजर वराळ मित्र मंडळाने घेतली आहे. यावेळी सुभाष वराळ, आप्पासाहेब वराळ, विलास हारदे, मेजर गोपाळ वराळ, मेजर विजय वराळ, मेजर अमोल ठुबे, सुभेदार संजय लेंभे दत्ता उनवने, बाबाजी वाघमारे, भास्कर कवाद, सागर आतकर आदी यावेळी उपस्थित होते. बारहाते यावेळी म्हणाले सैन्य दलात कार्यरत असणारे सैनिक सेवानिवृत्त झाल्यानंतर खऱ्या अर्थाने देशसेवा करतात हे वराळ यांच्या माध्यमातून एक उत्तम उदाहरण असून वेताळबाबा स्टेडियम माध्यमातून त्यांनी गावचा नावलौकिक मोठा केला असून आजही पोलीस दलात काम करताना ते सेवाभाव करतात. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या प्रेरणेतून हे सर्व शक्य झाले असून त्यांचे बंधू धर्मरक्षक प्रतिष्ठानचे अध्यक्ष पैलवान सुभाष वराळ यांनी सुद्धा समाजसेवेतून आदर्श घालून दिला असून वराळ बंधूंचे काम आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

### पावसाची पुन्हा हुलकावली

## ढगाळ वातावरणाबरोबरच हवेत गारवा वाढला

**नंदकुमार कुरूमकर । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून ढगाळ वातावरण निर्माण होत आहे. त्यामध्ये गेल्या दोन दिवसापूर्वी आदरा नक्षत्र बरसल्याने हवेत सध्या गारवा निर्माण झाला आहे. वातावरणातील या बदलामुळे मानवी जीवनावर मोठा परिणाम जाणवत असल्याच्या प्रतिक्रिया ग्रामीण भागातून व्यक्त केल्या जात आहे. दरम्यान ढग जमा होतात, परंतु पावसाला जोर नाही. कधी रिमझिम पाऊस तोही तुरळक अशी परिस्थिती गेल्या दोन दिवसापासून निर्माण होत असल्याने शेतकरी खरीप हंगाम पेरणीकडे तूर्त तरी पाठ फिरवत असल्याचे दिसून येत आहे. आदरा नक्षत्र सुरू झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पाऊस पडला. परंतु हा कमी कालावधीचा पाऊस पेरणीसाठी योग्य नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. हवामान खाते जोरदार पावसाचा अंदाज देत असला तरी मात्र त्यात तथ्य नसल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे. जाणकार शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार जितका उन्हाळा कडक असेल तितक्याच प्रमाणात पावसाला मोठ्या प्रमाणात जोर असतो. परंतु चालू वर्षी पावसाने तब्बल दोन महिने ओढ दिली. उन्हाळ्याचा हंगाम अंगावर शहारे यावे अशाप्रकारे उन्हाची तीव्रता सर्वांनाच पाहायला मिळाली. या अतिउष्णतेमुळे वेगाने बाष्पीभवन होऊन सर्वत्र जलसाठा संपुष्टात आला.

**गुरुवारी २५ जून रोजी सूर्यदर्शन नाही**

दरम्यान श्रीगोंदा तालुक्यात २५ जून रोजी दिवसभर सूर्यदर्शन झाले नसल्याने पाऊस नेमका कोणता इशारा देत आहे? असा प्रश्न देखील शेतकऱ्यांसमोर उभा आहे. त्यामध्ये अनेक शेतकऱ्यांनी जवळपासच्या कृषी सेवा केंद्रातून खरीप हंगाम पेरणीसाठी बियाण्यांची खरेदी देखील केली. परंतु पावसाअभावी बियाणे घरातच पडून ठेवले आधीच शेतकरी कर्जाच्या विळख्यात सापडला खरीप हंगामासाठी शेतीच्या मशागतीचा खर्च, बियाण्यांचा खर्च, मजुरांचा खर्च शेतकऱ्यांनी केल्याने हातचे भांडवल देखील गुंतवून पडले गेले आहे. अशा या चक्रव्यूहात शेतकरी सध्या सापडला असून, निसर्गाने लवकरात लवकर भरपूर कृपावृष्टी करावी, म्हणून गावोगावी ग्रामदैवतांना साकडे घातल्याचे दिसून येत आहे.

## डंपरच्या रहदारीने शेवगावांत वाहतूक कोंडी




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शहरातील अतिक्रमणे हटवून रस्ते मोकळे करण्यात आले असले तरी वाहतूक कोंडीची समस्या अद्याप कायम आहे. विशेषतः शहरातील अरुंद गल्ल्या व बोळांमधून वाळू वाहतूक करणारे डंपर व अवजड वाहने बिनधास्तपणे धावत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेसह अंतर्गत रस्त्यांवर दिवसभर दुचाकी, रिक्षा आणि चारचाकी वाहनांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत अवजड डंपर अरुंद रस्त्यांमध्ये शिरल्याने वाहतूक ठप्प होत असून अनेकदा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. डंपर चालकांकडून वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. काही चालकांच्या मुजोर वर्तनामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

प्रशासनाने अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे केले असले तरी वाहतूक व्यवस्थापनाकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याने कोंडीची समस्या जैसे थे आहे. शहरातील गर्दीच्या भागातून अवजड वाहनांच्या वाहतुकीवर निर्बंध आणावेत, तसेच वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे अपघाताचा धोका निर्माण होत असून याकडे पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## केदारेश्वरची एफआरपी ची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा : ॲड. ढाकणे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील श्री केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याची गत वर्षी गळीत करण्यात आलेल्या उसाची एफआरपी ची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्याचे काम सुरू असून गत वर्षी गळीत केलेल्या २ लाख टनाच्या या एकूण एफआरपी पैकी ६५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली असून उर्वरित ३५ टक्के रक्कम ही येत्या १५ दिवसात कारखान्यार्फत अदा करण्यात येईल अशी माहिती ड. प्रतापराव ढाकणे यांनी दिली आहे. या बाबत ते म्हणाले की, गत वर्षी कारखाना उशिरा सुरू करण्यात येऊन २ लाख मे. टनाचे ऊसाचे गाळप करण्यात आले होते.

त्यामध्ये ८ जानेवारी पर्यंत गाळप करण्यात आलेल्या उसाची एफआरपी शेतकऱ्यांना अदा केली असून ९ जानेवारी २६ ते २८ फेब्रुवारी २६ पर्यंत कारखान्याने गाळप केलेल्या ऊसाची एफआरपी ची शेतकऱ्यांची रक्कम थकीत राहिल्याने व मे अखेर पर्यंत ती रक्कम बँकेकडून उपलब्ध होईल अशी आशा होती परंतु ती रक्कम उपलब्ध न झाल्याने व थकलेल्या रक्कमेमुळे कारखान्याला जप्तीची नोटीस दिली होती. असे सांगून ड. ढाकणे म्हणाले की, मागील महिन्यातच राज्यातील कारखान्याच्या शिष्ट मंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत केंद्रीय सहकार मंत्री ना. अमित शहा यांना भेटून साखरेच्या दरात वाढ करण्याबाबत मागणी केली होती परंतु तो निर्णय अजूनही प्रलंबित असल्याने कारखान्याचा उत्पादित खर्च लक्षात घेता ग्रामीण भागात सुरू असलेला हा उद्योग मोठ्या आर्थिक अडचणीशी सामना करत आहे. जिल्हा सहकारी बँक केदारेश्वरला कधीच आर्थिक मदत करत नसून शेतकऱ्यांची कामधेनू टिकली पाहिजे म्हणून वेग - वेगळ्या बँकेकडून रक्कम उपलब्ध करण्यात येत असल्याने मिळालेल्या त्या रक्कमेचे शेतकऱ्यांना उसाच्या रक्कमेपोटी वाटप करण्यात येत असल्याचे सांगून कारखान्याने आजपर्यंत जेवढे ऊसाचे गळीत केलेले आहे. त्या मध्ये ऊस तोडणी मजूर,मुक्काम, कारखान्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासह कुणाच्याही रक्कमा थकीत ठेवलेल्या नसून सर्वांचेच पेमेंट वेळेवर करण्यात आलेले असल्याचेही शेवटी ड ढाकणे यांनी सांगितले आहे. या वेळी कारखान्यावर नव्यानेच हजर झालेले कार्यकारी संचालक किरण शेलारही उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन ग्रामस्थांच्या मध्यस्थीने सोडले

**कासार पिंपळगाव :** पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर शेतकरी भाऊसाहेब पाराजी राजळे यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य आपल्या मागण्यासाठी अन्नत्याग आंदोलन करुन उपोषणाला (दि.२४) रोजी बसले होते. राजळे कुटुंबातील सर्व सदस्यांनी रोजी सकाळी दहा वाजल्या पासून या उपोषणाला सुरुवात केली होती. परंतु या दोन राजळे कुटुंबातील जागेचा वाद हा पाथर्डी



न्यायालयात प्रलंबित आहे. यावेळी संभाजी बन्सी राजळे, अप्पासाहेब राजळे, गणेश भगत, नवनाथ तिजोरे, आदिनाथ कांबळे, अमित भगत, नारायण भगत, ग्राम विकास अधिकारी प्रमोद म्हस्के, तलाठी ऋषिकेश घोरतळे, ज्ञानदेव जगताप, संतोष शेळके यांनी विशेष सहकार्य करत उपोषण सोडवले. पाथर्डी न्यायालयातील प्रलंबित निकालाच्या अधिन राहुन हा गावातील वादाचा प्रश्न गावातच मिटविण्यात आला आहे.

# टक्केवारीच्या खेळात अडकला शेवगावचा विकास?

## अतिक्रमणे काढूनही विकासाला मात्र खिळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव शहरात अनधिकृत ठिकाणी असलेले अतिक्रमणे मागील वर्षी गाजावाजा करून काढण्यात आली. गावचा विकास व रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली शेवगावची बाजारपेठ उध्वस्त करण्यात आली. मात्र टक्केवारीच्या खेळात शेवगाव शहराच्या विकासाला खिळ पडल्याचे दिसून येत आहे. लोकप्रतिनिधी आणि स्थानिकच्या पदाधिकाऱ्यात




बेबनाव असल्याने शेवगाव चा विकास मात्र होऊ शकलेला नाही ही सत्य परिस्थिती आहे. शहरातील अतिक्रमणात साडेनऊशे दुकानदार विस्थापित झाले. त्यांच्यासाठी कोणतेही बाजार संकुल अद्याप तरी नगरपालिका उभारू शकलेली नाही. अतिक्रमणात दुकाने गेल्याने काहींनी शहराचा मार्ग निवडला तर काहींनी इतरांच्या हाताखाली कामाला जाण्यास सुरुवात केल्याचे चित्र तालुक्यात निर्माण झाले, याला सर्वस्वी जबाबदार लोकप्रतिनिधी आणि स्थानिक पदाधिकारीच असल्याचा आरोप सर्वसामान्य दुकानदार, नागरिक करत आहेत. शहरातील नाल्याची कामे पावसाळ्यापूर्वीच होणे गरजेचे होते तेही झाले नाही रस्ता रुंदीकरण होणे गरजेचे होते तेही अद्याप झाले नाही रस्ता रुंदीकरण व नालीचे नवीन बांधकाम टक्केवारीच्या खेळात अडकल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरू आहे. कंत्राट दाराला दिलेला ठेका पुन्हा बदलत जात असल्याने कंत्राटदार सुद्धा या परिस्थितीत हदबल झालेली दिसतात. कामे कशा पद्धतीने करायची हे सुद्धा कंत्रातदार ठरू शकत नाहीत. सुरू झालेले काम बंद करून कंत्राटदार आपले साहित्य इतर ठिकाणच्या कामावर पोहोच करत असल्याचे चित्र बघायला मिळत आहे.

विकासाच्या नावाखाली शेवगाव शहरातील कोट्यावधी रुपयांची बाजारपेठ अनाहूतपणे नाहीशी करण्यात स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी हेच याला जबाबदार असल्याची भावना शेवगाव शहरातून व्यक्त होत आहे.

**नगरपालिका गाळे उभारणार कधी**

शेवगाव नगरपालिकेच्या अधिकृत जाग्यावर धन दांडग्यांनी अतिक्रमण करून मोठमोठे गाळे उभारलेले आहेत. या जाग्यावरील गाळे मोकळे करून त्या ठिकाणी व्यापारी संकुल नगर पालिका बांधू शकते मात्र प्रशासक याकडे सोयीस्कर रित्या दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. शेवगाव शहरात नगरपालिकेच्या ठिकाणी पाच ते सहा भूखंड असून त्या ठिकाणी व्यापारी संकुल बांधले गेले तर शेवगाव शहरातील व्यापारी वर्गाला याचा फायदा होऊन बाजारपेठ वाढीस चालना मिळेल.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार दि.२६ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# दिवाणी कारावासाच्या धाकाने दुसऱ्याच दिवशी थकबाकी भरली!

## श्रीराम फायनान्सच्या वसुली प्रकरणात न्यायालयाचा निर्णय; कर्जबुडव्यांना इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : कर्ज घेऊन जाणूनबुजून परतफेड टाळणाऱ्या कर्जदारांना चाप बसावा असा महत्त्वपूर्ण निर्णय श्रीरामपूर येथील दिवाणी न्यायाधीश आशिष मारलेच्या यांनी दिला. श्रीराम फायनान्स कंपनीच्या थकीत कर्ज वसुली प्रकरणात न्यायालयाने संबंधित कर्जदारास एक महिन्याच्या दिवाणी कारावासाची शिक्षा सुनावली होती.

त्यानुसार कर्जदाराला राहाता येथील दिवाणी जेलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र केवळ एक दिवस कोठडीत राहिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी कर्जदाराने संपूर्ण थकीत रकमेचा भरणा केल्याने या प्रकरणाची जिल्हाभर चर्चा सुरू झाली आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशात संबंधित कर्जदाराने वारंवार नोटिसा, अटक वॉरंट आणि न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष केल्याचे नमूद केले आहे. न्यायालयाने कर्जदाराची भूमिका हेतुपुरस्सर असल्याचे निरीक्षण नोंदवत, तो न्यायालयीन आदेशाचे पालन करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ५१, ५५, ५८ तसेच ऑर्डर २१ नियम ४० अन्वये त्याला एक महिन्यासाठी दिवाणी जेलमध्ये ठेवण्याचा आदेश देण्यात आला होता.

विशेष म्हणजे, राहाता येथील दिवाणी कारागृहात दाखल झाल्यानंतर अवघ्या एका दिवसातच कर्जदाराने संपूर्ण थकीत रकमेचा भरणा करण्याची तयारी दर्शवली आणि रकमेचा भरणा केला. त्यामुळे न्यायालयीन कारवाईचा आणि दिवाणी जेलच्या शिक्षेचा धाक किती प्रभावी ठरू शकतो, याचे हे ठळक उदाहरण मानले जात आहे. या आदेशात न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले आहे की, जाणीवपूर्वक कर्जफेड टाळणाऱ्या थकबाकीदारांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असून अशा डिफॉल्टरना लोखंडी हाताने हाताळण्याची गरज आहे.

न्यायालयाच्या या निरीक्षणालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. कर्ज घेऊन परतफेड न करण्याची मानसिकता वाढत असताना हा निर्णय वित्तीय संस्था, बँका आणि इतर कर्जदात्यांसाठी दिलासादायक ठरणारा असून, जाणूनबुजून कर्ज थकवणाऱ्यांना कायद्याचा धाक दाखवणारा महत्त्वाचा न्यायनिवाडा म्हणून या प्रकरणाकडे पाहिले जात आहे.

# जिवंत शब्बीर परतला; मग दफन झाला कोण?

## एक्सह्युमेशननंतर तपासाला वेग; मृतदेह ओळख प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सोनगाव येथे घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. हरवलेला समजून ज्याच्या मृतदेहावर कुटुंबीयांनी धार्मिक विधीनुसार दफनविधी केला, तोच शब्बीर जमादार मन्सूरी काही दिवसांनी जिवंत परतल्याने दफन करण्यात आलेला मृतदेह नेमका कुणाचा होता, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रकरणामुळे मृतदेह ओळख प्रक्रियेसह तपास यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. माहितीनुसार, शब्बीर जमादार मन्सूरी काही दिवसांपूर्वी घरातून बाहेर पडला होता. बराच शोध घेऊनही तो सापडला नसल्याने कुटुंबीयांनी हरवल्याची नोंद केली होती. त्याच काळात परिसरात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. उपलब्ध माहिती व प्राथमिक ओळखीच्या आधारे संबंधित मृतदेह शब्बीरचाच असल्याचे मानण्यात आले. आवश्यक कायदेशीर व वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला आणि त्याच्यावर धार्मिक परंपरेनुसार दफनविधी करण्यात आला. मात्र काही दिवसांनी शब्बीर जिवंत असल्याची माहिती समोर आली. एका ठिकाणी तो आढळून आल्यानंतर त्याने स्वतःची ओळख सांगितली. सामाजिक माध्यमांद्वारे ही माहिती कुटुंबीयांपर्यंत पोहोचली. व्हिडीओ कॉलद्वारे ओळख निश्चित झाल्यानंतर त्याला घरी आणण्याअत आले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने दफन करण्यात आलेल्या मृतदेहाचे एक्सह्युमेशन (दफन केलेला मृतदेह बाहेर काढणे) केले. संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मृतदेह बाहेर काढून पुढील तपासासाठी आवश्यक नमुने संकलित करण्यात आले. या तपासातून मृत व्यक्तीची खरी ओळख स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे. पंचनाम्यावेळी पोलीस, महसूल, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. या संपूर्ण घटनेमुळे मृतदेह ओळख, वैद्यकीय पडताळणी आणि प्रशासनिक प्रक्रियांमध्ये अधिक अचूक व सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित झाली असून आता सर्वांचे लक्ष तपासाच्या अंतिम निष्कर्षाकडे लागले आहे.

# सोनईजवळ बिबट्याचा पुन्हा हल्ला; बोकड ठार, ग्रामस्थांमध्ये भीती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनईजवळील धनगरवाडी परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी (दि. २२) मध्यरात्री भुसारी वस्तीवर बिबट्याने हल्ला करून एका बोकडाचा फडशा पाडल्याची घटना घडली.

यापूर्वीही परिसरात पाळीव जनावरांवर हल्ल्यांच्या घटना घडल्याने शेतकरी व पशुपालक चिंतेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वांबोरी रोडलगत असलेल्या धनगरवाडी शिवारातील भुसारी वस्तीवरील शेळ्यांच्या गोठ्यात बिबट्याने घुसून हल्ला केला. या हल्ल्यात एक बोकड ठार झाला. सकाळी घटना उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली. पावलांचे



ठसे व जनावरावरील जखमांवरून हा हल्ला बिबट्यानेच केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. याच रात्री मुळा उजव्या कालव्याजवळील संजय वाघ यांच्या वस्तीवरील एका कुत्र्यावरही बिबट्याने हल्ला केल्याची माहिती समोर आली असून त्यात कुत्रा मृत झाला.

सलग घडलेल्या या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती आणि अस्वस्थता वाढली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोनई परिसरातील ऊस शेती व दाट झाडीच्या भागात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे अनेक पशुपालकांनी जनावरे रात्री बंदिस्त ठिकाणी ठेवण्यास सुरुवात केली आहे, तर पालकांनी लहान मुलांना एकटे बाहेर पाठविणे टाळले आहे.

बिबट्याला पकडण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा, वन विभागाने रात्री गस्त वाढवावी, नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी तसेच ट्रॅप कॅमेरे बसवून हालचालींवर लक्ष ठेवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा हल्ल्यांच्या घटना वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पत्रकार जाधव यांना पिस्तूल रोखून धमकी; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील साकूर पठार भागात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीसंदर्भातील वृत्तांकन करणाऱ्या पत्रकार सहदेव जाधव यांना घरात घुसून पिस्तूल रोखत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अखेर तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती व प्रसार माध्यम संस्था हिंसा आणि मालमत्ता प्रतिबंध अधिनियम तसेच शस्त्र अधिनियमान्वये ही कारवाई करण्यात आली आहे.



माहितीनुसार, पत्रकार सहदेव जाधव यांनी मुळा नदीपात्रातील अवैध वाळू उपसा तसेच अकलापूर येथील शेतकऱ्याच्या वाहनावर डंपर घालून जीवे मारण्याचा प्रयत्न झाल्याच्या घटनेचे वृत्तांकन केले होते. त्यानंतर १७ जून रोजी रात्री सुमारे ८ वाजता अजित मोरे व त्याच्यासोबत आलेले दोन अनोळखी व्यक्ती जाधव यांच्या घरी गेले. बातमीबाबत जाब विचारत त्यांनी वृत्तांकन थांबविण्यासाठी पैशांची ऑफर दिली. जाधव यांनी नकार दिल्यानंतर दोघांनी पिस्तूल रोखून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी तक्रार दाखल करण्यासाठी जाधव यांनी घारगाव पोलिस ठाण्यात धाव घेतली होती. सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास विलंब झाल्याचा आरोप करण्यात आला. अखेर पोलिसांनी संबंधित कायद्यांनुसार गुन्हा नोंदविला असून पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

या घटनेमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून साकूर पठार भागातील अवैध धंदे व कायदा–सुव्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

# स्कुटीच्या डिक्कीतून एक लाखांची रोकड लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहरात भरदिवसा एका शेतकऱ्याच्या स्कुटीच्या डिक्कीतून एक लाख रुपये रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली असून यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. बारागाव नांदूर येथील आण्णासाहेब जानकू देवकर (वय ६५) यांनी १९ जून रोजी राहुरी बसस्थानकासमोरील महाराष्ट्र बँकेतून मुदत ठेव पावती मोडून एक लाख रुपये काढले होते. ही रक्कम स्कुटीच्या डिक्कीत ठेवून ते घरी निघाले. वाटेत मल्हारवाडी रस्त्यावरील एका दुकानासमोर गाडी उभी करून ते पेंड खरेदीसाठी गेले असता अज्ञात चोरट्यांनी डिक्की उघडून रोकड लंपास केली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

# घरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण; तरुणाविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहर हद्दीतील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचे राहत्या घरातून अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली असून याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार, २३ जून रोजी रात्री कुटुंबीयांसह झोपलेल्या मुलीचा २४ जून रोजी पहाटे दोनच्या सुमारास घरातून बेपत्ता झाल्याचे तिच्या वडिलांच्या निदर्शनास आले. नातेवाईकांनी परिसरात शोध घेतला; मात्र मुलगी आढळून आली नाही. यानंतर मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून ऋतिक सुरेश शिंदे (रा. मुलनमाथा, ता. राहुरी) याच्याविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक मुलगी व संशयिताचा शोध घेत आहे.

# कॉक्रोच जनता पार्टी ही युवकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी आभासी पार्टी : कृष्णराज महाडिक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : कॉक्रोच जनता पार्टी ही युवकांमध्ये संभ्रम निर्माण करणारी आळशी लोकांची आभासी पार्टी आहे. त्यामुळे त्यास गांभीर्याने घेण्याची गरज नाहीये. आता त्यांना मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. अहिल्यानगरला येण्याआधी राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेतली. त्यांची भेट खूप काही शिकवणारी ठरली. त्यांचे प्रेरणादायी विचार व काम जवळून पाहण्याची संधी यामुळे मला मिळाली, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी पत्रकार परिषदेत केले. युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक हे गुरवारी नगर दौऱ्यावर आले होते. त्यानिमित्त युवा मोर्च्याच्या वतीने शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील पालकमंत्री संपर्क कार्यालयात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे, नगरसेवक निखील वारे, युवा मोर्चा सरचिटणीस कैलास गर्जे आर्दीसह पदाधिकारी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक पुढे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मभूमीत आल्याचा आनंद अहिल्यानगरमध्ये आल्यावर होत आहे. २१ जून रोजी युवा शक्ती जागर यात्रेला सुरवात केली आहे. या माध्यमातून संपूर्ण राज्याचा दौरा करण्याची संधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनामुळे मला मिळाली आहे. या यात्रेच्या माध्यमातून युवांचे प्रश्न समजून घेत त्यांच्याशी संवाद साधत आहोत.

राज्यातील युवकांचा रोजगार प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारच्या माध्यमातून युवा मोर्चा प्रयत्न करत आहे. कौशल्य विकास मंत्रालयाच्या माध्यमातून लवकरच रोजगार मेळाव्याचे आयोजन केले जाणार आहे. युवकांमधील व्यसनाधीनता कमी होण्यासाठी राज्य सरकारने योग्य पाऊल उचलले आहे. ड्रगमाफियांना आता कडक शासन होणार आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीसाठी युवा मोर्चा जनजागृती करणार आहे. मी स्वतः खेळाडू असल्यामुळे खेळाडूंच्या प्रश्नांची मला जाण आहे. ते सोडवण्यासाठी पाठपुरावा चालू असून क्रीडा खात्याकडे विविध प्रस्ताव दिले आहेत. प्रारंभी युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रुद्रेश अंबाडे यांनी सर्वांचे स्वागत केले. या वेळी भाजपाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, सरचिटणीस महेश नामदे, अमोल निस्ताने, कालिंदी केसकर, सचिन वायकर, अनिकेत निंबाळकर, विजय गायकवाड, मुकुल गंधे, अशोकराव गायकवाड, सोनावणे आर्दीसह पदाधिकारी उपस्थित होते. युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक हे प्रथमच नगर शहरात आल्याने त्यांचे नगर शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.

केडगाव येथे नगरसेवक सुजय मोहिते यांनी महाडिक यांचे स्वागत करून त्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाच्या साहित्यांचे वाटप केले. तसेच जुन्या बस स्थानक जवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ युवा मोर्चाच्या वतीने त्यांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात व फटाक्यांची आतिश बाजी करून पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून कृष्णा महाडिक यांनी ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरातही गणपतीची आरती केली.

# घुटेवाडीत चोरट्यांचा धुमाकूळ: विहिर खोदायचे साहित्य लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

श्रीगोंदा : तालुक्यातील घुटेवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी विहीर खोदाईसाठी वापरले जाणारे सुमारे १ लाख ६० हजार रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजयकुमार दत्तात्रय लोखंडे ( रा. घुटेवाडी, ता. श्रीगोंदा) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. दि.२२ जून रोजी सायंकाळी ५ वाजल्यानंतर ते २४ जून रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या मालकीचे साहित्य चोरून नेले. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ३ फूट व्यासाच्या १८ लोखंडी रिंग, दोन ड्रिलिंग मशीन आणि दोन ५ एच.पी. इलेक्ट्रिक मोटारी यांचा समावेश असून, एकूण मालाची किंमत १ लाख ६० हजार रुपये असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे . या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २३८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवलकर यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

**सलग चोरीच्या घटनांनी ग्रामीण भागात चिंता**

घुटेवाडी परिसरात झालेल्या या चोरीमुळे शेतकरी व कंत्राटदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेती आणि विहीर खोदाईसाठी वापरले जाणारे महागडे साहित्यच चोरट्यांनी लक्ष्य केल्याने ग्रामीण भागातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांनी चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# जोरदार वाऱ्यासह पावसामुळे केळीची बाग उद्ध्वस्त

## पंचनाम्यासाठी अधिकारी फिरकलेच नाही



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : मंगळवारी रात्री जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकरी रमाकांत संपतलाल खटोड (रा.बेलापूर ) यांची एक एकर केळीची बाग उध्वस्त होऊन सुमारे पंधरा लाख ते वीस लाखांचे नुकसान झाले आहे.शासनाने तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी खटोड यांनी केली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील महसूल गट क्र.७ मधील केशव गोविंद बनालगतच खटोड यांची शेती आहेत.त्यात त्यांनी गेल्या वर्षी एक एकर क्षेत्रात आधुनिक पद्धतीने अडीच हजार केळीच्या झाडांचे प्लांटेशन केले आहे.येत्या महिनाभरात हार्वेस्टिंगला येणाऱ्या या बागेतून अंदाजे साठ ते पासष्ट टन केळांचे उत्पादन अपेक्षित होते. मात्र, मंगळवारी ते बुधवारी रात्री जोरदार वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे केळीची बाग उध्वस्त झाली आहे. शासनाने तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी,अशी मागणी त्यांनी केली आहे. विशेष म्हणजे शेतामाला भाव मिळत नाही.

त्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहेत.मात्र उक्कलगाव येथील ग्राममहसूल अधिकारी व कृषी अधिकारी यांना घटनेची दोन कल्पना दिलेली असतानाच अद्याप कोणताही अधिकारी शेतीकडे फिरकला नसल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहेत. कृषी विभागाची उदासीनताही त्यास कारणीभूत असल्याचा आरोप नुकसान ग्रस्त शेतकरी रमाकांत खटोड यांनी केला आहे.


### कृषी विम्याची सुविधा न मिळाल्याने भुर्दंड

गतवर्षी केळीची लागवड केल्यानंतर नेहमीप्रमाणे आपण पिक विमा उतरविण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधून पाठपुरावा केला. मात्र सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. वास्तविक अहिल्यानगर जिल्ह्यात ही सुविधा उपलब्ध असूनही श्रीरामपूर तालुक्याची लिंक खुली झाली नाही. त्यामुळे सतर्क राहुनही पिक विम्याच्या सुविधेपासून वंचित रहावे लागल्याने हा मोठा आर्थिक फटका बसला आहेत.

# गळनिंब येथील सिद्धेश्वर मंदिरात चोरीचा प्रयत्न हाणून पाडला; तिघे जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील गळनिंब येथील सिद्धेश्वर मंदिरात मध्यरात्री दानपेटी फोडून चोरी करण्याचा प्रयत्न ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे फसला. या प्रकरणी लोणी पोलिसांनी तिघा संशयितांना अटक करून त्यांच्याकडून दुचाकी, मोबाईल व चोरीच्या प्रयत्नासाठी वापरलेली साधने असा मुद्देमाल जप्त केला आहे. १२ जून रोजी पहाटे दोनच्या सुमारास मंदिर परिसरात गस्त घालत असताना रायभान वाघ यांना मंदिरातून ठोकाठोकीचा आवाज ऐकू आला. त्यांनी तत्काळ आरडाओरड करून ग्रामस्थांना सावध केले.



ग्रामस्थ घटनास्थळी पोहोचताच मंदिरात असलेले तिघेजण दुचाकीवरून बेलापूरच्या दिशेने पळून गेले. मंदिराची पाहणी केली असता दानपेटीचे बाहेरील कुलूप तोडल्याचे आढळले. मात्र आतील कुलूप सुरक्षित असल्याने कोणतीही रोकड चोरीस गेली नव्हती. तसेच दानपेटीकडे असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची दिशा बदलण्यात आल्याचेही निदर्शनास आले. घटनास्थळी ब्लेड, पिशवी व तुटलेले कुलूप आढळून आले. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी प्रवरानगर–पाथरे मार्गावरून रविंद्र भिमराज कापसे (रा. वाकडी), अक्षय बाबासाहेब खरात (रा. वाकडी) व अमोल लक्ष्मण पारे (रा. कोपरगाव) यांना ताब्यात घेतले.

चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपींकडून सुमारे ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने तिघांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल एन. पी. साळवे करीत आहेत.